सुविचार
दुः खों से भरी इस दुनिया में सच्चे प्रेम की एक बूंद भी मरुस्थल में सागर की तरह है।

विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र
दैनिक
# यशवंत

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/रविवार दि. २८ जूलै २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१६२ ✦पृष्ठे८✦किंमत १रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦


## ‘ओबीयू’ द्वारे होणार सॅटेलाईट टोल संकलन

नवी दिल्ली : सध्या वाहनांना टोल देण्यासाठी टोल नाक्यावर थांबावे लागते. यामध्ये मोठ्या प्रमाणावर मॅनपॉवर लागत होते. तसेच, अनेकदा तगडा जामही लागतो. फास्टॅग आल्यानंतर मनुष्यबळ कमी झाले. पण सर्व्हरमध्ये समस्या आल्यास जामची समस्या कायम होती. आता सॅटेलाइट बेस्ड टोल कलेक्शन सिस्टीममध्ये टोल कारमध्ये लावलेल्या ट्रॅकिंग सिस्टीमद्वारेच वसूल केला जाईल. यासाठी सॅटेलाइट स्वत:च कारच्या निश्रि्चत केलेल्या अंतराची गणना करेल आणि त्यानुसार टोल वसूल केला जाईल. या सिस्टीमला सॅटेलाइट बेस्ड टोल कलेक्शन सिस्टीम किंवा जीपीएस बेस्ड टोल कलेक्शन सिस्टीम म्हणतात.

सॅटेलाईट बेस्ड टोल कलेक्शन सिस्टीम कारमध्ये लावलेल्या ओबीयू (ऑन-बोर्ड युनिट) च्या मदतीने काम करेल. या ओबीयूच्या मदतीने सॅटेलाईट कारच्या निश्चित केलेल्या अंतराचा मागोवा घेईल.

या नवीन सिस्टीमसाठी कारमध्ये ओबीयू बसवावा लागेल. हे ओबीयू कारची प्रत्येक माहिती गोळा करेल, ज्याला हायवेवर लावलेल्या कॅमे-यांनी सॅटेलाइटसोबत शेअर केले जाईल, ज्यामुळे सॅटेलाइटद्वारेच टोल वसूल केला जाईल. या सिस्टीममध्ये तुम्हाला ओबीयूसोबत जोडलेल्या वॉलेटमध्ये पैसे ठेवावे लागतील. सध्या कारमध्ये ओबीयू उपलब्ध नाही, त्याला बाजारातून बसवावे लागेल. असे मानले जात आहे की, ही सिस्टीम लागू झाल्यानंतर कारमध्ये ओबीयू आधीपासून लावलेले असतील.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा दावा आहे की, संपूर्ण जगात हा पहिलाच टोल कलेक्शन सिस्टीम आहे, ज्यामध्ये जीपीएस बेस्ड तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. नवीन टोल कलेक्शन सिस्टीम लागू झाल्याने वाहनचालकांना टोलवर थांबावे लागणार नाही. यामुळे हायवेवर ना तर जाम लागेल आणि ना लोकांचा वेळ वाया जाईल. असे मानले जात आहे की, या सिस्टीममुळे प्रवास आणखी सोपा होईल.

डिसेंबर २०२३ मध्ये, नितीन गडकरी यांनी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणचे लक्ष्य मार्च २०२४ पर्यंत या नव्या प्रणालीला लागू करण्याचे आहे, असे सांगितले होते. टोल नाक्यावरील प्रक्रियांना सुव्यवस्थित करणे आणि प्रतीक्षा वेळ कमी करण्याच्या प्रयत्नांबद्दल वर्ल्ड बँकेला सूचित करण्यात आले आहे. सॅटेलाईट टोल नाक्यावरील सरासरी प्रतीक्षा वेळ लक्षणीय कमी झाला आहे. कर्नाटकातील बंगळुरू-मैसूर विभागात आणि हरियाणातील पाणिपत-हिसार विभागात या प्रणालीचा यशस्वी वापर झाला आहे.

## महाराष्ट्रासारख्या आर्थिक संपन्न राज्याला एवढी रक्कम खर्च करणे शक्य



मुंबई : प्रतिनिधी- ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने’अंतर्गत समाजातील सर्व घटकांतील पात्र महिलांना दीड हजार रुपयांचा लाभ देण्यात येणार आहे. शासनाकडून विविध योजनांच्या घोषणांनंतर विरोधकांकडून पुन्हा सरकारवर टीका होऊ लागली आहे. राज्यावर कर्जाचे ओझे असताना सरकारने केवळ आगामी विधानसभा डोळ्यांसमोर ठेवून ही घोषणा केल्याची टीका आता विरोधकांकडून होताना दिसत आहे. विरोधकांच्या टीकांवर बोलताना ‘ महाराष्ट्रासारख्या आर्थिक संपन्न राज्याला एवढी रक्कम खर्च करणे शक्य आहे’ असे प्रत्युत्तर अजित पवारांनी दिले आहे.

दरम्यान, महाराष्ट्रात सरकारच्या लाडकी बहीण योजनेनंतर लाडक्या भावांसाठी काय देणार? असा प्रश्र्न विरोधक सरकारला विचारू लागले. पुढे जाऊन राज्य सरकारने लाडका भाऊ योजना सुरू केली. याअंतर्गत विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी निधी दिला जाणार आहे. अशा विविध योजनांची घोषणा केल्यानंतर विरोधकांकडून या योजना चालविण्यासाठी राज्याच्या तिजोरीवर काय परिणाम होईल यावर टीका व प्रश्र्न उपस्थित होत होते. मात्र, आता विरोधकांच्या या प्रश्र्नांना स्वत: उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या सोशल मीडिया अकाऊंटवर उत्तर दिले आहे. सध्या अजित पवार यांचे हे ट्विट चांगलेच चर्चेत आले आहे.

चालू आर्थिक वर्षात योजनेसाठी आवश्यक एकूण ३५ हजार कोटी रुपयांच्या संपूर्ण रकमेची (पान ७ वर)

## विजय मल्ल्याच्या अडचणीत भर, ‘सेबी’ची कठोर कारवाई



मुंबई : - बाजार नियामक संस्था सेबीने देशातून पळून गेलेल्या उद्योजक विजय मल्ल्यावर कठोर कारवाई केली. सेबीनं विजय मल्ल्यावर चुकीच्या पद्धतीनं व्यवहार केल्यामुळे ३ वर्षांची बंदी घातली. विदेशी संस्था आणि बँकांद्वारे बेकायदेशीरपणे व्यवहार करून कंपन्यांच्या किंमती वाढवल्या आणि त्यातून नफा मिळवल्याचा आरोप सेबीनं केला.

शेअर, म्युच्युअल फंड गोठवले

सेबीनं बंदी घालण्याबरोबरच विजय मल्ल्याचा भारतातील शेअर्स आणि म्युच्युअल फंडातील हिस्सा गोठवला. याशिवाय तो यापुढे कोणत्याही लिस्टेड भारतीय कंपनीचे संचालक म्हणून रुजू होऊ शकणार नाही. सेबीनं यावरही बंदी घातली आहे.

विजय मल्ल्यानं नोंदणीकृत संस्थांमार्फत आपलं नाव आणि ओळख लपवून परदेशी संस्थात्मक गुंतवणुकीचा गैरवापर (पान ७ वर)

## राहुल गांधींना दिल्लीत मिळाला नवा पत्ता

मुंबई, २७ - काही दिवसांपूर्वी पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाने चांगली कामगिरी केली. काँग्रेसच्या मित्रपक्षांची आघाडी असलेल्या ’इंडिया आघाडी’ने एकमताने त्यांची विरोधी पक्ष नेता म्हणून निवड केली. लोकसभेच्या गृह समितीने सभागृहातले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या सरकारी निवासस्थानासाठी ’५-सुनहरी बाग रोड’ बंगल्याचा प्रस्ताव दिला आहे. गृह समितीशी संबंधित सूत्रांनी ही माहिती दिली आहे.

काँग्रेस पक्ष आणि राहुल गांधी यांच्याशी संबंधित सूत्रांनीदेखील या माहितीला दुजोरा दिला आहे. सूत्रांनी असंही सांगितलं, की राहुल गांधीनी या प्रस्तावाला संमती दिल्यास हा बंगला त्यांचं नवं घर असेल. काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय सरचिटणीस आणि राहुल यांच्या भगिनी प्रियांका वद्रादेखील शुक्रवारी ’५ सुनहरी बाग’ इथल्या बंगल्यावर गेल्या होत्या.

(पान ७ वर)

## वीरशैव तत्वज्ञान हे जगातील पहिले तत्त्वज्ञान

सोलापूर : तत्त्वज्ञानाचे मूळ हे वेद व आगमन आहे. या माध्यमातून जगाला पंचसूत्राचे मार्गदर्शन पंचाचार्य व जगद्गुरुंनी सर्वप्रथम केले आहे. जगदज्योती महात्मा बसवेश्र्वरांची वचनेही आपल्याला जगण्याचे तत्त्वज्ञान शिकवतात. त्यामुळे वीरशैव तत्त्वज्ञान हे जगातील सर्वप्रथम तत्त्वज्ञान ठरते असे प्रतिपादन श्री काशी जगद्गुरू डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांनी केले.

शनिवारी सायंकाळी डॉ. निर्मल कुमार फडकुले सभागृहात झालेल्या श्री जगद्गुरू विश्र्वाराध्य ज्ञानसिंहासन, जंगमवाडी मठ, वाराणसी यांच्या पुरस्कार वितरण समारंभ प्रसंगी ते बोलत होते.



यावेळी श्रीकाशी जगद्गुरू डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या अमृतहस्ते व श्रीकाशी जगद्गुरू डॉ. मल्लिकार्जुन विश्र्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांच्या दिव्य सान्निध्यात व कडबगाव मठाचे मठाधिपती ज्ञानसिद्ध ओंकार शिवाचार्य स्वामीजी, ष. ब्र. राचलिंग शिवाचार्य परंडकर स्वामीजी यांच्या प्रमुख उपस्थितीत हे पुरस्कार वितरित करण्यात आले.

यावेळी श्री काशी जगदगुरु डॉ. मल्लिकार्जुन विश्र्वाराध्य महास्वामीजी यांनीही मनोगत व्यक्त केले. दहा हजार रुपये रोख रक्कम, गौरवपत्र, रुद्राक्ष माळ, शाल व श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप होते.

प्रारंभिक महांतेश स्वामी यांनी वेदघोष केला. कार्यक्रमप्रसंगी मान्यवरांचे स्वागत प्राचार्य विद्यानंद स्वामी यांनी केले तर प्रास्ताविक डॉ. अनिल सर्जे यांनी तर सूत्रसंचालन रेवणसिद्ध वाडकर व आभार प्रदर्शन राजशेखर बुरकुले यांनी केले.

यावेळी सोलापूर विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू इरेश स्वामी, सिद्धया स्वामी-हिरेमठ, बृहन्मठ होटगी मठाचे सचिव शांतय्या स्वामी, श्री शिवयोगी शास्त्री-होळीमठ, बाबुराव मैदर्गीकर, भी. शी स्वामी, मल्लिकार्जुन प्रशालेचे मुख्याध्यापक वैजनाथ हत्तुरे, जिल्हा परिषदेचे शिक्षण विस्तार अधिकारी (पान ७ वर)

## श्री क्षेत्र निळकंठेश्वर देवस्थान विकासासाठी पाच कोटी रुपयाचा निधी मिळवून देणार

लातूर दि.२७- असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या लातुर तालुक्यातील मौजे निळकंठ येथील श्री निळकंठेश्वर या देवस्थानास राज्य शासनाच्या ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत ब दर्जा प्राप्त झाला असून या मंदिराच्या सर्वांगीण विकासाचा आणि भाविक भक्तांच्या सोयी सुविधेचा परिपूर्ण प्रस्ताव सादर करा निश्चितपणे पाच कोटी रुपयांचा निधी राज्यातील महायुती शासनाकडून मिळवून देऊ अशी ग्वाही भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी दिली.




लातुर तालुक्यातील मौजे निळकंठ येथील श्री निळकंठेश्वर देवस्थानास राज्य शासनाच्या ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत ब दर्जा मिळवून दिल्याबद्दल भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांचा श्री निळकंठेश्वर देवस्थान आणि निळकंठ, पिंपळगाव, आंबा, मसला, भोसा, तांदूळजा यासह विविध गावातील भाविक भक्त आणि नागरिकांच्या वतीने लातूर येथे भाजपाच्या संवाद कार्यालयात शनिवारी दुपारी यथोचित सत्कार करून आभार व्यक्त केले.

यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, निळकंठ येथील श्री निळकंठेश्वर हे जागृत देवस्थान असून या मंदिर परिसरात येणाऱ्या भाविक भक्तासह प्रत्येकास प्रसन्नता मिळते. भाविकांची वाढती संख्या पाहता या मंदिर परिसराचा विकास व्हावा येणाऱ्या भाविकांना सोयी सुविधा मिळाव्यात यासाठी अधिकचा निधी आवश्यक असल्याने या मंदिराचा राज्य शासन ग्रामविकास विभागाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रा स्थळ, तीर्थक्षेत्र विकास योजनेचा ङ्बफ दर्जा मिळवून दिला आहे. यामुळे मंदिराच्या सर्वांगीण विकासासाठी निधीची कमतरता पडणार नाही. तेव्हा मंदिर ट्रस्ट आणि त्या परिसरातील नागरिकांनी सर्वांगीण विकासाचा आणि भाविक भक्तांना सोईसुविधा मिळाव्यात असा परिपूर्ण प्रस्ताव तात्काळ शासनाकडे सादर करावा या प्रस्तावास मान्यता मिळवून देण्याचे काम करू अशी ग्वाही दिली.

निळकंठ आणि परिसरातील नागरिकांनी मंदिराच्या विकासाचा एकीने निर्णय घेतला. ही आनंदाची बाब असून आपण सर्वजण मिळून चांगला विकास घडून आणू. श्रद्धेचे स्थान, मंदिराचे वैभव आणि उंची टिकविण्याचे काम करू या. राज्य शासनाकडून या मंदिर परिसराच्या विकासासाठी निश्चितपणे किमान पाच कोटी रुपयांचा निधी मिळून देऊ असे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले (पान ७ वर)



## आ. अमित देशमुख यांनी बाभळगाव निवासस्थानी नागरिकांच्या घेतल्या भेटी

लातुर प्रतिनिधी- राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी शनिवार दि. २७ जुलै रोजी सकाळी बाभळगाव निवासस्थानी मराठवाड्यासह लातूर जिल्हाभरातून आलेल्या विविध संस्था पदाधिकाऱ्यांसह नागरिकांच्या भेटी घेऊन त्यांच्या अडीअडचणी समजून घेऊन निवेदनाचा व निमंत्रणाचा स्वीकार करून संबंधितांना पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी सूचना केल्या.

यावेळी लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, माजी महापौर दीपक सूळ, विलास को-ऑपरेटिव्ह बँकेचे व्हा चेअरमन समद पटेल, व्हाईस चेअरमन विजय देशमुख, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती सुनील पडिले, प्रा.बी.व्ही. मोतीपोवळे, दगडूसाहेब पडीले, डॉ. पंकज शेळके, (पान ७ वर)






## गुजरातमध्ये ‘चांदीपुरा’ व्हायरसमुळे ४८ मुलांचा मृत्यू

अहमदाबाद: - गुजरातमध्ये चांदीपुरा व्हायरसच्या रुग्णांमध्ये वाढ होत असल्याचे पहायला मिळत आहे. या व्हायरसमुळे ४८ जणांचा मृत्यू झाला आहे. तर १२७ नवीन प्रकरणं दाखल झाली आहेत. अनेकांवर विविध रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

अरवली जिल्ह्यातील चांदीपुरम प्रकरणासंदर्भात केंद्र सरकारचे पथक पुण्याहून पोहोचले. ज्यांनी बाधित भागांना भेटी दिल्या. या पथकाने जिल्ह्यातील भिलोडा आणि मेघराज तालुक्यातील विविध भागातून रक्ताचे नमुने गोळा केले. हे नमुने पुण्याला पाठवण्यात आले आहेत.

दरम्यान, हा धोकादायक व्हायरस गुजरात आणि राजस्थानमध्ये अधिक आढळून येत आहे. चांदीपुरा व्हायरस हा विशेषत: १२ ते १४ वर्षे वयोगटातील मुलांमध्ये आढळतो. ताप, डोकेदुखी, अंगदुखी, जुलाब, उलट्या आणि फ्लू ही त्याची लक्षणं आहेत. यामुळे गंभीर एन्सेफलायटीस देखील होतो. ही एक स्थिती आहे ज्यामुळे मेंदूला सूज येते.

या विषाणूचा संसर्ग दुर्मिळ असल्याने, त्यावर अद्याप योग्य उपचार नाही. मात्र वेळीच या आजाराची लक्षणे समजल्यास योग्य उपचार सुरू केल्याने, तो गंभीर होण्याचा आणि मेंदूशी संबंधित विकार होण्याचा धोका कमी केला जाऊ शकतो.

१९६५ मध्ये नागपूर शहरातील चांदीपुरा येथे एका नवीन व्हायरस प्रादुर्भाव दिसून आला. १२ ते १५ वर्षे वयोगटातील अनेक मुलांचा या व्हायरसमुळे मृत्यू झाला आहे. हा व्हायरस देशात पहिल्यांदा नागपूरच्या चांदीपुरा गावातून आला होता, म्हणूनच या व्हायरसला चांदीपुरा व्हायरस म्हणून ओळखले जाते.

दैनिक
यशवंत
रविवार दि.२८ जुलै २०२४
२
अहमदपूर/चाकूर परिसर
E-mail :- yashahmedpur@gmail.com संपर्क मो.९८५०२७३०४७, ९८२३११२९०७

# स्वामी विवेकानंद महाविद्यालय शिरूर ताजबंद, येथे समाजशास्त्र विषयाच्या कार्यशाळेचे आयोजन

अहमदपूर दि.२६(विलास चापोलीकर)ः स्वामी विवेकानंद महाविद्यालय शिरूर ताजबंद, येथे समाजशास्त्र विषयाच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, स्वामी विवेकानंद महाविद्यालय शिरूर ताजबंद व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या वतीने समाजशास्त्र विषयाच्या कार्यशाळेचे आयोजन दिनांक ३० जुलै २०२४ रोजी सकाळी ठीक १० : ०० वाजता केले आहे. २०२० च्या नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणी संदर्भात विद्यापीठ स्तरावर चर्चा घडवून आणण्यासाठी अशा कार्यशाळेचे प्रथमच आयोजन विद्यापीठ स्तरावर होत आहे. या कार्यशाळेचे उद्घाटन अहमदपूर चाकूर विधानसभेचे आमदार मा. बाबासाहेब पाटील साहेब यांच्या शुभ हस्ते संपन्न होणार आहे. या कार्यशाळेचे बीज भाषक म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्रा. डॉ. डी. एन. मोरे



तर प्रमुख उपस्थितीमध्ये मानव्यविद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता डॉ. पराग खडके, समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. एस. पी. घायाळ आणि अभ्यास मंडळाचे सदस्य हे उपस्थित राहणार आहेत. या कार्यशाळेत नवीन शैक्षणिक धोरण: २०२० समाजशास्त्र विषयाच्या अभ्यासक्रम पुनर्रचनेच्या संदर्भातील चर्चा घडवून आणण्यासाठी प्रथमच या कार्यशाळेचे आयोजन केले आहे. या कार्यशाळेसाठी विद्यापीठ परिक्षेत्रातील समाजशास्त्र विषयाचे जवळपास पंच्याहत्तर अभ्यासक प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. या कार्यशाळेचे तीन सत्रात आयोजन केले आहे. पहिल्या सत्रात समाजशास्त्र विषयातील मेजर व मायनर कोर्स संदर्भातील चर्चा होणार आहे. तर दुसऱ्या सत्रात समाजशास्त्र विषयातील जेनेरिक इलेक्टिव्ह आणि स्किल इन्हान्समेंट कोर्सया संदर्भात अभ्यास मंडळाचे सदस्य मार्गदर्शन व चर्चा करणार आहेत. तर तिसऱ्या सत्रात या कार्यशाळेचा समारोप होणार आहे. हा समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी.जी. माने यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. याप्रसंगी समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. घायाळ एस. पी. तर महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयातील पदव्युत्तर समाजशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. शफिका अन्सारी, उदगीर हे उपस्थित राहणार आहेत. ही कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी महाविद्यालय पातळीवर विविध समित्या गठीत करण्यात आल्या आहेत.

तरी याप्रसंगी उपस्थित राहण्याचे आवाहन कार्यशाळेचे संयोजक प्राचार्य डॉ.डी.जी. माने व प्रा. डॉ. नारायण कांबळे यांनी केले आहे.

# महात्मा फुले महाविद्यालयात कारगिल विजय दिवस साजरा

अहमदपूर दि.२७(बालाजी कारामुंगीकर)ः महात्मा फुले महाविद्यालयात कारगिल विजय दिवस साजरा करण्यात आला.

याबाबत अधिक माहिती अशी की, पंचवीस वर्षांपूर्वी भारतीय सैन्याने तीन महिने चाललेल्या कारगिलच्या युद्धात पाकिस्तानवर मिळविलेल्या ऐतिहासिक विजयाची आठवण म्हणून येथील महात्मा फुले महाविद्यालयात प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कारगिल विजय दिवस साजरा करण्यात आला. राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. दुर्गादास चौधरी हे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून कवी डॉ. मारोती कसाब हे उपस्थित होते. त्यांनी आपल्या भाषणात कारगिल युद्धाची माहिती सांगून, देशासाठी प्राण पणाला लावून लढलेल्या भारतीय जवानांच्या शौर्य, पराक्रम आणि त्यागाचा गौरव केला.




तसेच कारगिल युद्धात शहीद झालेल्या भारतीय जवानांना आदरांजली वाहिली. अध्यक्षीय समारोपात डॉ. डी.डी. चौधरी म्हणाले की, कारगिल युद्धातील भारतीय जवानांचे हौतात्म्य लक्षात ठेऊन प्रत्येक भारतीय नागरिकाने देशासाठी कार्य केले पाहिजे. देशाची एकता आणि अखंडता कायम राखून देशाला प्रगतीपथावर नेण्याची जबाबदारी सर्वांची असल्याचेही यावेळी ते म्हणाले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. बब्रुवान मोरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन ह.भ. प. डॉ. अनिल महाराज मुंढे यांनी केले.यावेळी डॉ. सतीश ससाणे, डॉ. ए. एस. मोरे, डॉ. संतोष पाटील, डॉ. दिगंबर माने, डॉ. नागराज मुळे, डॉ. प्रशांत बिरादार, प्रा. प्रकाश गायकवाड, कार्यालयीन प्रमुख प्रशांत डोंगळीकर, अजय मुरमुरे, शिवाजी चोपडे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

**टी.सी. हरवली आहे.**

**कणसे मिरा मनोहर** या नावाची **जय भवानी विद्यालय, सुगाव, ता. चाकुर जि. लातूर** येथील १० वी पासची टी. सी. चाकूर-अहमदपूर प्रवासामध्ये २३ जुलै २०२४ रोज मंगळवार दुपारी १.०० वाजता हरवली आहे.

सदरील टी.सी. कोणास सापडल्यास खालील मोबाईल नंबर वर संपर्क करावा.

९७३०२७०९४२

**टी.सी. हरवली आहे.**

**रेखा विष्णु मुंढे** या नावाची शंकर महाविद्यालय, घाटनांदुर येथील बारावी पासची टी. सी. अंबाजोगाई-अहमदपूर प्रवासामध्ये २४ जुलै २०२४ रोज बुधवार दुपारी २.०० वाजता हरवली आहे.

सदरील टी.सी. कोणास सापडल्यास खालील मोबाईल नंबर वर संपर्क करावा.

७९७२६३२३२०

# सेवापुर्ती गौरव सोहळा साजरा



हडोळती दि.२७(नागसेन गायकवाड)ः जिल्हा परिषद कन्या शाळा हडोळती येथे कोनाळे एस.एस.(सह.शिक्षक) वचापटे ए. ई.(सह.शिक्षक) यांचा सेवापुर्ती सोहळा संपन्न झाला.

याबाबत अधिक माहिती अशी की, सेवापूर्ती गौरव सोहळा कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संभाजी सुर्यवंशी (अध्यक्ष शा. शि. समिती, हडोळती) प्रमुख पाहुणे हडोळतीच्या सरपंच सौ. शकुंतला वामन भोगे व उपसरपंच सौ. इंदुताई माधव पवार, तसेच वळसंगी केंद्राचे केंद्रप्रमुख कासार सर, केंद्रीय मुख्याध्यापक मद्देवाड सर, घटक शाळेचे सर्व मुख्याध्यापक आणि शिक्षकवृंद, विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

यावेळी कोनाळे एस.एस. आणि चापटे ए. ई. यांचा सपत्नीक पुष्पहार घालून पुढील आयुष्याच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

सदरील कार्यक्रमाचे प्रास्ताविक कन्या शाळेचे मुख्याध्यापक सय्यद एम.एम. तर सूत्रसंचालन श्रीमती बालिका जाधव यांनी केले. तर उपस्थितांचे आभार श्रीमती पोपलगट यांनी मानले.

# अमृत महोत्सवी वर्षानिमित्त क.तू.प. महाविद्यालयात वृक्षारोपण

हडोळती दि.२७(नागसेन गायकवाड)ः अमृत महोत्सवी वर्षानिमित्त क.तू.प. महाविद्यालयात वृक्षारोपण करण्यात आले.

याबाबत अधिक माहिती अशी की, किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रा.पी.टी. पवार सर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त आज दिनांक २७ जुलै २०२४ रोजी किसान शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचलित कर्मयोगी तुळशीराम पवार महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या




वतीने वृक्षारोपणाचा कार्यक्रम संपन्न झाला. प्रभारी प्राचार्य डॉ. बालाजी भंडारे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

या प्रसंगी महाविद्यालयाचे राष्ट्रिय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. सादिक शेख , रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. मनोज पवार तसेच महाविद्यालयातील डॉ. सूर्यभान बुवा, डॉ.कोनेरू डूम्मलवड, आयक्यूएसी समन्वयक डॉ. उमाकांत माकणीकर, डॉ.रावसाहेब इंगळे, डॉ. सुवर्णा टेंकाळे मॅडम, डॉ . परमेश्वर लोहकरे सर इत्यादींच्या उपस्थितीत वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येनी उपस्थित होते.

# आदर्श दांपत्य महात्मा फुले व सावित्रीबाई फुले

क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी आपल्या हयातभर दीनदुबळ्या गरीब शेतकरी जनतेला ब्राम्हणी गुलामगिरीतून सोडविण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी शिक्षणप्रसारापासून ते सार्वजनिक सत्यधर्म स्थापन करण्यापर्यंत अनेक मार्गांचा वापर केला. मानव मुक्तीची पहाट या महामानवांच्या प्रयत्नानेच उगवली. पर्वताची उंची जशी त्याच्याजवळ गेल्याशिवाय कळत नाही, त्याप्रमाणेच आपल्याला महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचे हिमालयाएवढे सामाजिक शैक्षणिक व धार्मिक कार्य समजावून घ्यायचे असल्यास त्यांच्या जीवन कार्याचा बारकाईने अभ्यास करावा लागेल, त्यांच्या सामाजिक प्रतिष्ठा व प्रेरणा समजावून घ्याव्या लागतील. क्रांतीसूर्य ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांनी अहोरात्र प्रयत्न करून पुण्याच्या कर्मठ भूमीत शूद्रांच्या शिक्षणाचा, सामाजिक परिवर्तनाचा पाया मजबूत केला. त्यांच्यावर केला गेलेला अत्याचार, त्यांची बदनामी, पावलोपावलीची छळवणूक हे सर्व सहन करून शूद्रांचा उध्दार आणि विद्येचे दान देण्याचे महान कार्य या दाम्पत्याने केले नसते, तर कदाचित इथल्या शूद्रांना आणि स्त्रियांना अजून कित्येक वर्षे अंधाराच्या काळोखात खितपत पडावे लागले असते.

झाडामंदि ग झाड सये
आंब्याचं डेरेदार
संगीते भैना तुला
सर्व्या गोतात आई थोर

अशा वरील स्वरूपातील ओव्या गात-गात जात्यावर दळण दळणारी, घराच्या बाहेर न पडणारी आणि सतत धाकात वागणारी सून, मुलगी, बहिण, आई, आत्या, आजी घरोघरी असायची. हा साठ-सत्तर दशकांच्या पूर्वीचा काळ म्हणता येईल. या काळात मग अशा स्त्रिया रांधा वाढा उष्टी काढा यासाठी जीवन जगत होत्या. अशा या काळाच्या पार्श्वभूमीवर मक्रांतीची ज्योतफ सावित्रीबाई फुले या महाराष्ट्राच्या भूमीवर जन्माला आल्या.

सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यातील नायगाव या छोट्याशा गावात खंडोजी नेवसे पाटील नावाचे समतावादी विचारांचे सद्गृहस्थ राहत होते. या गावातील नेवसे पाटील यांचे घराणे फौजफाट्यात अगदी मानाच्या स्थानावर होते. हे कष्टाळू माळयांचे कुटुंब होते आणि सोबतच पाटीलकीदेखील सांभाळत असत. याच कुटुंबात ३ जानेवारी १८३१ साली लक्ष्मीबाई व खंडोजी नेवसे पाटील यांच्या पोटी सावित्रीबाईंचा जन्म झाला. सावित्रीबाई तीन भावात एकट्या असल्याने सहाजिकच सर्वांच्या लाडक्या होत्या. एवढेच नव्हे तर त्यांचा जन्म झाला तेव्हा आनंदाने खंडोजी नेवसे पाटील यांनी पूर्ण गावात साखर वाटली आणि या लहानग्या सावित्रीच्या जन्माचे स्वागत मोठ्या प्रमाणात झाले. परोपकारी वृत्ती, निरपेक्ष बुद्धी व गोरगरीबांविषयीची कणव हे वडिलांमध्ये असलेले गुण सावित्री मध्ये देखील होते. हे लहानसे बाळ दिसामासा मोठे होत होते आणि आपल्या लीला सर्वांना दाखवत होते. हळूहळू सावित्रीबाई मोठ्या होऊ लागल्या, घर कामात शेतीच्या कामात प्रवीण होत होत्या. त्या आईला घरकामात तर वडिलांना शेतीच्या कामात मदत करत असत. अशा तऱ्हेने सावित्रीबाईंमध्ये त्याकाळी मुलींसाठी लागणारे गुण, पात्रता पूर्ण झाली होती.

इकडे पुण्यात गोविंदराव गोऱ्हे उर्फ फुले नावाचे सधन शेतकरी होते. त्यांचा फुलांचा खूप मोठा व्यवसाय होता. त्यांचा ज्योतिबा नावाचा अत्यंत गुणी मुलगा होता. ज्योतीबांच्या आई चिमणाबाई यांचे निधन ते लहान असताना झाले होते त्यामुळे गोविंदराव यांच्या मावस बहीण सगुणाबाई क्षीरसागर यांनी त्यांचा सांभाळ केला होता. सगुणाबाई यांचे खंडोजी नेवसे पाटलांकडे जाणे-येणे होते. दरम्यान त्यांनी सावित्रीबाईंना पाहिले होते व त्या त्यांना आवडल्या होत्या. त्यांनी खंडोजी नेवसे पाटील व गोविंदराव फुले यांच्याकडे विवाहासाठी प्रस्ताव ठेवला. नकार देण्याचा प्रश्नच नव्हता आणि १८४० मध्ये जोतिबा फुले व सावित्रीबाई यांचा विवाह झाला. त्यावेळी जोतिबांचे वय तेरा वर्षे तर सावित्रीबाईंचे वय नऊ वर्ष होते. विवाहानंतर सावित्रीबाई पुण्यात आल्या. प्रेमळ सासरे व मातृतुल्य सगुणाबाई यांच्या प्रेमळ छत्रछायेत सावित्रीबाईंचे दिवस जात होते. अचानक एके दिवशी तात्यासाहेब म्हणजेच महात्मा फुले रागारागात घरी आले दोघींच्याही लक्षात आले, की काहीतरी बिनसले आहे.

महात्मा फुले म्हणाले, माझ्यासारख्या सधन व्यक्तीला जर हे भेदाभेदाचे विष पचवावे लागत असेल तर गोरगरिबांची काय अवस्था असेल? हे थांबलेच पाहिजे. देऊ का गोरगरिबांना शिक्षण? ते शिकतील शहाणे होतील व ही मानसिक गुलामी कमी होईल! नकार देण्याचा प्रश्नच नव्हता कारण सगुणाबाई एका इंग्रज अधिकाऱ्यांच्या मुलाचा सांभाळ करण्याचे कार्य करत होत्या. त्यामुळे शिक्षणाचे महत्त्व त्यांना देखील समजलेले होते. या प्रसंगातूनच क्रांतीपर्वाला सुरुवात झाली आणि मग अडथळ्यांवर मात करत-करत शिक्षण प्रवाहाला सुरुवात झाली. प्रयत्नांच्या पराकाष्ठेतून हा शिक्षण प्रपंच नेटाने पुढे सुरू झाला. यातीलच अडथळा दूर करण्याचा अजून एक भाग व सावित्रीबाईंची शिक्षण घेण्याची तीव्र इच्छा यातून सगुणाबाई व सावित्रीबाईंचे शिक्षण सुरू झाले. शेतात दुपारच्या वेळी जमीन साफ करून धुळीतील धुळाक्षरे गिरवायला सुरुवात झाली. कुशाग्र बुद्धिमत्तेच्या सावित्रीबाईंनी खूप कमी कालावधीत ज्ञानग्रहण केले व सगुणाबाईंनी देखील प्रगती केली.

शाळेला शिक्षिका होण्यास सावित्रीबाई पात्र आहेत हे लक्षात आल्यावर महात्मा फुलेंनी सावित्रीबाईंच्या इच्छेने अध्यापिकेचे शिक्षण घेण्यास अहमदनगर येथे मि. फॅरॉर यांच्याकडे शिक्षण घेण्यास सावित्रीबाईंना पाठवले.

दुष्काळातील कार्य :

१८७६-७७ साली खूप मोठा दुष्काळ पडला होता. या दुष्काळात लोक अन्न-अन्न करत होते. अशा या वेळी महात्मा फुले व सावित्रीबाई फुलेंनी अन्नछत्र सुरू केले, छात्रालये सुरू केली आणि हे सर्व सावित्रीबाई पाहत असत. एवढेच नाही तर त्यांनी आर्थिक मदत मिळविण्यासाठी पदयात्राही काढल्या.

जोतीरावांचे महापरिनिर्वाण :

महात्मा फुलेंना पक्षाघात झाला. ते अंथरुणाला खिळले. तरी त्यांनी डाव्या हाताने आपला मसार्वजनिक सत्यधर्मफ हा ग्रंथ लिहून पूर्ण केला. संभाव्य गोष्टींची कल्पना त्यांना आली होती, त्यानुसार त्यांनी सावित्रीबाईंजवळ आपल्या अंत्यविधीसंदर्भात अशी इच्छा व्यक्त केली की, मीठात घालून माझ्या मृत शरीराचे दफन केले जावे. २८ नोव्हेंबर १८९० रोजी महात्मा फुलेंनी जगाचा निरोप घेतला.

इतिहासात सावित्रीबाई फुले एकमेव अशा महिला आहेत की त्यांनी हा भव्यदिव्य आवाका शिवधनुष्यासारखा लीलया पेलला. त्या स्वयंप्रज्ञ होत्या, म्हणून त्या या अग्निदिव्याच्या कसोटीला उतरू शकल्या व आपली कालत्रयी छाप इतिहासावर कायमस्वरूपी उमटवून गेल्या. प्रस्थापीत व्यवस्थेने त्यांना कितीही अनुल्लेखाने मारले तरीही त्या अधिक प्रकर्षाने दिव्य ज्योती प्रमाणे झळकतच राहतील. ही गोष्ट काळाच्या कसोटीवर सिद्ध झालेली आहे.

**वर्षा वसंतराव लगडे (माळी)**
यशवंत विद्यालय, अहमदपूर
जि.लातूर (महाराष्ट्र)
मो. नं. ९६६५४१४२०८

## हार-जीत....

हार कर भी हार न मानना
यहीं हमारी जीत है
हार कर ही हमे आगे बढ़ने
की राह मिलती है...

हार ही हमें अपने लक्ष्य
तक पहुंचने की चाह
निर्माण करती हैं...

हार ने से ही कहीं न कहीं
जीत होती है
हार जीत हमारे जीवन में
अक्सर आती ही रहती हैं...

हार कर जीतना यही हमारे
जीवन को सफल बनाता है
यह जीवन है हार तो आएंगी ही.
हार कर भी हारना नहीं
कोशिश कर जीवन में आगे
बढ़ाना है...



विद्या जगदीश मंडले

दैनिक यशवंत
नियमित वाचा

## कबीरवाणी

दोस पराए देखि करि,
चला हसन्त हसन्त,
अपने याद न आवई,
जिनका आदि न अंत।

**भावार्थ :** माणूस दुसऱ्याला नाव ठेवत असतो त्यांना दोष देत असतो आणि स्वतः खुप आनंदी होत असतो. मात्र दुसऱ्यांचे दोष बघता बघता स्वतःचे दोष तो विसरत असतो त्या दोषांचा कुठे अंतच नसतो. दुसऱ्याला दोष देत असताना स्वार्थी, कधी ढोंगी म्हणत असतो. मात्र दुसऱ्याकडे बोट दाखवत तो स्वतः विसरुन जातो की ज्याच्याकडे आपण एक बोट केले आहे मात्र आपल्याकडे बाकिचे उरलेली सर्व बोटे आहेत. म्हणुन संत कबीर म्हणतात दुसऱ्याला दोष देवू नये. त्याच्यापेक्षा माझ्यामध्ये अनंत, अनंत दोष आहेत.

**डॉ. बालाजी गोविंदराव कारामुंगीकर**
मो. ९८२३११२९०७

# यशवंत धाराशिव जिल्हा

रविवार दि. २८ जुलै २०२४

३

कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane@gmail.com


## भारतीय संविधान अमृत महोत्सवी वर्षानिमित्त जनजागृती

धाराशिव दि.२७ (प्रतिनिधी) – भारतीय संविधान अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त मतदार जनजागरण समितीच्यावतीने वर्षभर कार्यक्रम घेण्यात येत आहेत. दर महिन्यातील २६ तारखेला संविधानावरती व्याख्यान, संविधान उद्देशिका वाचन करुन भारतीय संविधान अमृत महोत्सवी वर्षानिमित्त जनजागरण केले जात आहे. दि.२६ जुलै रोजी राजगीर बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या कार्यालयात भारतीय संविधान उद्देशिकेचे सामुदायिक वाचन करण्यात आले. यावेळी मतदार जनजागरण समितीचे गणेश वाघमारे, संजय गजधने, अंकुश उबाळे, बंशी कुचेकर, संपतराव शिंदे, बाबासाहेब बनसोडे, बापु धावारे आदींसह इतर उपस्थित होते. प्रास्ताविक बंशी कुचेकर यांनी तर आभार संजय गजधने यांनी मानले.



# शेतकऱ्याला केंद्रबिंदू मानून जिल्ह्याच्या विकासाला चालना - प्रा.डॉ. सावंत

धाराशिव दि.२७ (प्रतिनिधी) – जिल्ह्याची अर्थव्यवस्था ही शेतीवर अवलंबून आहे. केवळ पावसाच्या पाण्यावर इथला शेतकरी अवलंबून न राहता त्याला बारमाही सिंचनाची व्यवस्था निर्माण झाली पाहिजे. यासाठी उजनी प्रकल्पातून ७ टीएमसी पाणी लवकरच उपलब्ध होणार आहे. शेतकरी यामधून नगदी पिकाकडे वळून बारामाही पिके घेतील. तसेच शेतीपूरक व्यवसाय व कृषी प्रक्रिया उद्योग मोठ्या प्रमाणात सुरू होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून जिल्ह्याच्या विकासाला चालना देण्यात येत असल्याचे प्रतिपादन पालकमंत्री प्रा.डॉ. तानाजीराव सावंत यांनी दि.२६ जुलै रोजी केले.

परंडा तालुक्यातील वाटेफळ येथे विविध विकास कामे केल्याबद्दल ग्रामस्थांच्या वतीने आयोजित सत्कार कार्यक्रमात प्रा.डॉ. सावंत बोलत होते. यावेळी माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष धनंजय सावंत, माजी जिल्हा परिषदेचे कृषी व पशुसंवर्धन समिती सभापती दत्तात्रय साळुंखे, परंडा पंचायत समितीचे माजी सभापती गौतम लटके व परंडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक राहुल डोके यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना प्रा.डॉ.सावंत म्हणाले की, परंडा, भूम व वाशी तालुक्यातील रस्त्यांसाठी विविध योजनेतून निधी उपलब्ध करून दिला आहे. त्यामुळे मतदारसंघातील एकही रस्ता आता निधीअभावी शिल्लक राहणार नाही. या तिन्ही तालुक्यात औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी तीन ठिकाणी एमआयडीसी मंजूर केली आहे. एमआयडीसीसाठी लागणारी भूसंपादन प्रक्रिया सुरू झाली आहे. येत्या गुढीपाडव्यापर्यंत उजनी प्रकल्पातून सात टीएमसी पाणी सीना कोळेगाव प्रकल्पात येणार आहे. त्यामुळे हा परिसर सुजलाम सुफलाम होऊन येथे शेतीपूरक उद्योग सुरू होतील आणि यामधून अनेकांच्या हातांना रोजगार उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. शेतकरी पाण्याच्या व्यवस्थेतून समृद्ध होण्यास मदत होईल असे प्रा.डॉ.सावंत यांनी सांगितले.

जिल्हा मागास असल्यामुळे केंद्राने जिल्ह्याचा समावेश आकांक्षीत जिल्ह्यात केला आहे. आकांक्षीत जिल्ह्याचा लागलेला हा डाग आपल्याला पुसायचा असल्याचे सांगून प्रा.डॉ.सावंत पुढे म्हणाले की, शिवजल क्रांतीच्या माध्यमातून भूगर्भातील पाण्याची पातळी वाढली आहे. सिंचनाची सुविधा निर्माण होण्यास मदत झाली. नदी व नाले खोलीकरणाचे काम शिवजल क्रांतीतून झाले. रस्ते, पांदण रस्ते व अंतर्गत रस्त्यांसाठी ५० टक्के निधी जिल्हा नियोजन समितीतून या तालुक्यासाठी दिला आहे. अनेक योजना पुनर्जीवित केल्या आहे. बंद असलेली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व जिल्हा दुग्ध संघ लवकरच पुनर्जीवीत करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. दोन अडीच वर्षाच्या कालावधीत मतदारसंघातील रस्त्यांसाठी ७०० कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आहे. या कालावधीत भूम,परंडा आणि वाशी या तालुक्यात पावणेदोन हजार कोटी रुपयांची कामे होत आहे असे प्रा.डॉ.सावंत यांनी सांगितले. तसेच राज्य सरकारच्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण व मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना या महत्वकांक्षी योजना असल्याचे त्यांनी नमूद केले. तर घरातील दोन महिलांना महिन्याला प्रत्येकी दीड हजार रुपये मिळणार असल्यामुळे घर, किराणाचा खर्च या बहिणीच पूर्ण करणार आहे. तर प्रशिक्षण योजनेच्या माध्यमातून युवा वर्गाला रोजगार व नोकरीच्या संधी उपलब्ध होणार आहे. दोन्ही योजनांचा लाभ महिला आणि युवा वर्गाने घ्यावा असे आवाहन त्यांनी व करून प्रा. डॉ.सावंत पुढे म्हणाले,या तीन तालुक्यातील दोनशे शाळांना स्मार्ट बोर्ड देण्यात आले आहे.या शाळेतील विद्यार्थ्यांना संगणक शिक्षण देण्यात येत आहे. या शाळेतील विद्यार्थ्यांना पुढे संगणक शिक्षणाचे क्षेत्र निवडण्याची आवड निर्माण होऊन भविष्यात त्यांना रोजगाराच्या संधी या क्षेत्रात उपलब्ध होतील असे त्यांनी सांगितले.

### तांदूळवाडी- पाचवड येथील विकास कामांचे लोकार्पण

पालकमंत्री प्रा.डॉ. सावंत यांनी परंडा तालुक्यातील तांदुळवाडी येथे तांदुळवाडी – वृक्ष गावातील विविध विकास कामांचे लोकार्पण केले.यावेळी माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष धनंजय सावंत,जिल्हा परिषदेचे माजी पशुसंवर्धन व कृषी समिती सभापती दत्तात्रय साळुंखे, परंडा पंचायत समितीची माजी सभापती गौतम लटके व परंडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक राहुल डोके यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी पालकमंत्र्यांच्या हस्ते ५ कोटी ४३ लाख रुपये निधीतील खैरी नदीवरील पुलाचे,१ कोटी १० हजार रुपये बंधाऱ्याचे ४ कोटी रुपयांच्या निधीतून देऊळवाडी–तांदुळवाडी रस्ता डांबरीकरण, जन सुविधेच्या १० लाख निधीतून दुरुंदे गल्लीत सिमेंट रस्ता, १० लाख रुपये निधीतून देवीच्या मंदिरासमोर सभा मंडप, २५/१५ योजनेतून ५ लाख रुपये निधीतून हवालदार वस्ती येथे सिमेंट रस्ता, पाचवड येथे २५/१५ योजनेतील ५ लाख रुपये निधीतून सिमेंट रस्ता व पाचवड येथे १० लाख रुपये निधीतून पुलाच्या कामाचे उद्घाटन करण्यात आले. तांदूळवाडी येथील प्रतिष्ठित नागरिक भालचंद्र खरतडे व ग्रामस्थांनी गावाच्या विकासासाठी निधी उपलब्ध करून देऊन दोन्ही गावात विकास कामे केल्याबद्दल पालकमंत्री प्रा. डॉ.सावंत यांचा सत्कार केला.

यावेळी प्रा.डॉ.सावंत म्हणाले की, जवळपास या दोन्ही गावात ११ कोटी रुपयांच्या निधीतून विकास कामे करण्यात आली आहेत. या दोन्ही ग्रामस्थांच्या आणखी काही समस्या असतील तर त्या नक्की सोडविण्यात येतील. ७०० किमी नाल्याच्या खोलीकरणाची कामे कंपन्यांच्या उत्तरदायित्व निधीतून करण्यात आली आहेत. मराठवाड्यातील वॉटर ग्रीडसाठी १६ हजार ५०० कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात केली आहे. याचा लाभ जिल्ह्याला देखील मिळणार आहे. सीना–कोळेगाव प्रकल्पाचे ९५ टक्के काम पूर्ण झाले आहे. हा प्रकल्प पूर्ण होताच मतदारसंघात सिंचनाच्या मोठ्या प्रमाणात सुविधा उपलब्ध होतील. मतदारसंघातील प्रत्येक गावात सरासरी ५० लाख रुपये निधी विविध विकास कामांसाठी दिला आहे. शेतकरी समृद्ध तर युवक स्वावलंबी झाला पाहिजे या दृष्टीने विकासाचे नियोजन आहे असे ते म्हणाले.



केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करून जिल्हा विकसित करण्यात येईल असे सांगून प्रा.डॉ.सावंत पुढे म्हणाले, शेती पिकाला योग्य किंमत आणि शेतीवर आधारित प्रक्रिया उद्योग सुरू करण्यात येतील. विविध विकास कामांच्या माध्यमातून जिल्ह्याचा चेहरा मोहरा बदलण्यात येईल.भूम आणि परंडा नगरपरिषदेला विकासासाठी प्रत्येकी १५० कोटी रुपये निधी मंजूर केला आहे. वाशी नगरपरिषदेला पाणीपुरवठा योजनेसाठी ५० कोटी रुपये निधी लवकरच राज्य सरकार मंजूर करणार आहे. मतदारसंघात दोन ते अडीच वर्षात जवळपास पावणे २ हजार कोटी रुपये निधी विविध विकास कामांसाठी मंजूर केला असून यामधून विकास कामे करण्यात आली आहे तर काही कामे सुरू असून काही कामे लवकरच सुरू होणार आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात मतदार संघाच्या विकासासाठी देण्यात आलेला निधीची माहिती ग्रामस्थांपर्यंत पोहोचण्याचे काम कार्यकर्ते व नागरिकांनी नागरिकांचे आहे.जी कामे करण्यात येत आहे ते गुणवत्तापूर्ण व्हावी यासाठी ग्रामस्थांनी त्या कामाकडे लक्ष द्यावे. असे प्रा.डॉ. सावंत म्हणाले.

यावेळी पालकमंत्री प्रा.डॉ.सावंत यांच्या हस्ते मुगाव येथील विविध विकास कामांचे भूमिपूजन व लोकार्पण, आलेश्वर ते गोसावीवाडी या पाच किमी रस्त्याच्या ५ कोटी रुपये निधीतील कामांचे लोकार्पण, देऊळगाव येथे जनसुविधातील सभागृह व पुलाच्या कामाचे लोकार्पण, गोंदा येथील विविध विकास कामांचे भूमिपूजन व लोकार्पण करण्यात आले. कार्यक्रमाला संबंधित गावातील ग्रामपंचायतचे पदाधिकारी, प्रतिष्ठित नागरिक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त २६४ रक्तदात्यांनी केले दान



परंडा दि.२७ (प्रतिनिधी) – शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख तथा राज्याचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिराचे उद्घाटन माजी आमदार ज्ञानेश्वर पाटील यांच्या हस्ते दि.२७ जुलै रोजी करण्यात आले. दरम्यान, २६४ दात्यांनी रक्तदान केले. परंडा येथील पंचायत समितीच्या सभागृहात रक्तदान शिबिराचे आयोजन शिवसेना जिल्हाप्रमुख रणजीत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख मेघराज पाटील, शहरप्रमुख रईस मुजावर, माजी उपनगराध्यक्ष इस्माईल कुरैशी, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जयकुमार जैन, माजी नगरसेवक डॉ.अब्बास मुजावर, विनोद साळवे, संचालक ऍड. अनिकेत काशीद, संचालक शंकर जाधव, मधुकर गायकवाड, प्रशांत गायकवाड, सचिन शिंदे, युवासेना तालुका प्रमुख शिवाजी देवकर, युवा सेना शहरप्रमुख कुणाल जाधव, बळीराजा शेतकरी संघटनेचे राज्य संपर्कप्रमुख रमेश गणगे, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार काँग्रेस पार्टी सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष राहुल बनसोडे, माजी पं.स. सदस्य दीपक गायकवाड, शिवसेना शहर प्रमुख रईस मुजावर, वाकडीचे प्रदिप पाटील, जेष्ठ नेते सत्तार पठाण, सामाजिक न्याय विभागाचे जिल्हा सरचिटणीस घनश्याम शिंदे, उद्योजक अजिनाथ शेळके, सरपंच कृष्णा चौधरी, बप्पा गायकवाड, आप्पा गायकवाड, संतोष गायकवाड, ज्योतीराम गायकवाड, रेवण ढोरे, सुर्यकांत बोराडे, दत्ता मेहेर, शिवाजी गायकवाड, अहेमद भोले, सत्यवान शिंदे, काटवटे, तय्यब मुजावर, रफिक मुजावर, शाहरूख मुजावर, सलीम मुजावर, जावेद पटेल, तौफीक मुजावर, शरद डोरले, लक्ष्मीकांत माळी, महादेव गायकवाड, नागेश राऊत, राजा पाटील, नाना वाघमारे, अजिनाथ शेळके, लतीफ कुरैशी, मनोज जगताप, अशोक गवारे, बालाजी चोबे, रणजित अंधारे, सागर चोबे, दिपक पाटील, विकास जाधव, दादा होरे, बालाजी सौदळे, कैलास डागे, प्रताप पाटील, अमोल गोडगे, कैलास जाधव, प्रदिप नेटके, दिपक गायकवाड, बंटी गुळमिरे, जमुन मुजावर, वचिष्ट बप्पा, संजय वाघ, अशोक खैरे, आप्पा गोडगे, शंकर चहाण, समाधान पिंगळे, आमाराम नाईकनवरे, औदुंबर पाटील, ऋषिकेश सुर्यवंशी, अक्षय गवारे, बालाजी गायकवाड आदी उपस्थित होते. रक्त संकलन श्री भगवंत रक्तपेठीचे जनसंपर्क अधिकारी गणेश जगदाळे, व्हाईस चेअरमन अमर धस, सुयोग निकम, राधिका बेले, सलोनी पवार, दिव्या शिंदे, मोमीन अल्फिया, विजय तोडकरी, प्रणाली घोंगाणे यांनी यशस्वी प्रयत्न केले.

## असे झुंजलो आम्ही पुस्तकासाठी नागरिकांनी माहिती द्यावी

धाराशिव दि.२७ (प्रतिनिधी) – हैदराबाद मुक्तिसंग्रामाबाद जिल्ह्याचे योगदान महत्वपूर्ण आहे. या योगदानाची माहिती जिल्ह्यातील नागरिकांना आणि येणाऱ्या नव्या पिढीला व्हावी यासाठी....असे झुंजलो आम्ही....या पुस्तकाच्या भाग – २ चे काम जिल्हा प्रशासनाने हाती घेतले आहे.

जिल्ह्यात ज्या ज्या ठिकाणी हैदराबाद मुक्तिसंग्रामाचा लढा लढला गेला. परंतू काही ठिकाणी झालेल्या या लढ्यातील घटनेची माहिती आजपर्यंत पुढे आलेली नाही, ती माहिती जर जुन्या जाणत्या नागरिकांकडे व लेखकांकडे उपलब्ध असेल तर त्यांनी ही माहिती लेखी स्वरुपात जिल्हाधिकारी कार्यालयातील उपजिल्हाधिकारी संतोष भोर यांच्याकडे द्यावी. त्यामुळे त्या माहितीचा समावेश....असे झुंजलो आम्ही.... भाग – २ या पुस्तकात करता येईल.

मराठवाडा मुक्ती संग्रामातील स्वातंत्र्य सैनिकांनी त्यांनी दिलेली निवेदन आणि त्या अनुषंगाने प्राप्त अर्जाच्या अंमलबजावणीसाठी





स्वातंत्र्यसैनिक भास्करराव नायगावकर यांनी.... असे झुंजलो आम्ही.... या पुस्तकाचा भाग – २ चे काम पूर्ण करण्यासाठी प्रभारी अपर जिल्हाधिकारी शिरीष यादव यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले. यावेळी स्वातंत्र्य सैनिक भास्कर नायगावकर, स्वातंत्र्य सैनिक बुवासाहेब जाधव, उपजिल्हाधिकारी संतोष भोर, प्रा.डॉ. सतीश कदम, सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी कुंटला यांची उपस्थिती होती.

असे झुंजलो आम्ही हे पुस्तक तयार करण्यासाठी नागरिकांकडून आलेली सर्व माहिती एकत्रित करण्यात येणार आहेत. प्रा.डॉ.कदम, स्वातंत्र सैनिक नायगावकर, जाधव हे पुस्तक तयार करण्यासाठी सहकार्य व मार्गदर्शन करणार असून प्रा डॉ. कदम हे पुस्तक तयार करण्यासाठी विविध संदर्भ प्राप्त करून एक वस्तुनिष्ठ माहिती तयार करणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील नागरिकांनी व लेखकांनी मराठवाडा मुक्ती संग्रामात जिल्ह्याच्या योगदानाची त्यांच्याकडे असलेली माहिती उपलब्ध करून द्यावी असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

## आरक्षण बचाव यात्रेत हजारोच्या संख्यने सामिल व्हावे

धाराशिव दि.२७ (प्रतिनिधी) – वंचित बहुजन आघाडीच्यावतीने ओबीसी आरक्षण बचाव यात्रा वंचित बहुजन आघाडीच्या माध्यमातून राज्यात काढण्यात येत आहे. यानिमित्त वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांच्या दि.२८ जुलै रोजी जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले असून या सभेस नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन जिल्हा उपाध्यक्ष सुशीलकुमार बनसोडे यांनी केले आहे.

वंचित बहुजन आघाडीच्या माध्यमातून काढण्यात आलेल्या यात्रेचे आगमन धाराशिव शहरातील शाहू महाराज चौकात सायंकाळी ६ वाजता होणार आहे. तर ॲड. बाळासाहेब तथा प्रकाश आंबेडकर यांची सभा आयोजित करण्यात आली आहे. या यात्रेमध्ये वंचित बहुजन आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा रेखाताई ठाकूर, अविनाश भोसीकर, रमेश बारस्कर, ॲड.



रमेश गायकवाड, मराठवाडा उपाध्यक्ष प्रविण रणबागुल हे उपस्थित राहणार आहेत. ही यात्रा शाहू महाराज चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे आर्यन फंक्शन हॉल, सांजा रोड, पेट्रोल पंपाशेजारी धाराशिव येथे सभेचे अयोजन सायंकाळी ७.३० वाजता करण्यात आले आहे. त्यामुळे या यात्रेस व सभेत एससी, एसटी, ओबीसी, विद्यार्थी व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन भैय्यासाहेब नागटिळे, विकास बनसोडे, के. टी. गायकवाड, सुशिलकुमार बनसोडे, युसुफ सय्यद, शेखर बनसोडे, रुस्तमभाई पठाण, सुधीर वाघमारे, शहराध्यक्ष युसुफभाई सय्यद यांनी केले आहे.

# कमी गुंतवणुकीमुळे सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगातून रोजगाराच्या संधी – डॉ. घोष

धाराशिव दि.२७ (प्रतिनिधी) – देश स्वतंत्र झाला तेव्हा अवजड उद्योगाला चालना दिली. स्थानिक स्वराज्य संस्थांनी जास्तीत जास्त उद्योग क्षेत्रात काम केले पाहिजे, ही महात्मा गांधींची संकल्पना होती. मनुष्यबळाचा वापर उद्योग व्यवसायासाठी झाला पाहिजे यासाठी महात्मा गांधींनी त्यावेळी खादी उद्योगाला स्वदेशी वस्त्र निर्मिती म्हणून चालना दिली. आज मोठ्या उद्योगात जास्त आर्थिक गुंतवणूक करावी लागते. मात्र छोट्या उद्योगातून उत्पादित वस्तूंची मोठ्या उद्योगांना आवश्यकता असते. सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगात कमी गुंतवणुकीमुळे रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणात असतात असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष यांनी दि.२७ जुलै रोजी केले.

धाराशिव शहरातील मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीतील नियोजन समिती सभागृहात... सरकारी धोरणे व उपक्रमाबाबत जागरूकता वाढविण्यासाठी भागधारकांसोबत एमएसएमई क्षेत्राबाबतच्या इग्नाइट महाराष्ट्र....कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी उद्योग सहसंचालक बी.टी. यशवंते, मैत्रीचे नोडल अधिकारी प्रदीप दळवी, न्यू इंडिया इस्शुरन्सचे वरिष्ठ व्यवसाय व्यवस्थापक अनिल जाधव, सिडबीचे सहाय्यक महाव्यवस्थापक सनक दास, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे प्रभारी सहाय्यक आयुक्त संजय गुरव, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक चिन्मय दास व जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अमोल बळे यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ. घोष म्हणाले की, देशात ९३ सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग आहेत. त्याचे चांगले व वाईट परिणाम आहेत. आज विविध क्षेत्रातील बँका या उद्योग व्यवसायासाठी कर्ज हे आपल्या धोरणानुसारच उपलब्ध करून देतात. छोट्या उद्योगातून मोठे उद्योग उभे राहतात. छोट्या उद्योगातूनच मोठ्या उद्योगांना साहित्य व सुट्ट्या भागांचा पुरवठा केला जातो. जवळपास ६० ते ७० टक्के सुट्ट्या भागांचा पुरवठा हा छोट्या उद्योगातूनच होतो. छोट्या उद्योगातूनच सकल देशांतर्गत उत्पादन वाढलेले दिसते. तर ३० टक्के मूल्य संवर्धन हे छोट्या उद्योगातूनच होते. देशातील १३ ते १४ कोटी लोक हे सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग क्षेत्रात सहभागी असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच देशातील ५० टक्के उत्पादित साहित्य निर्यातीत सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग क्षेत्राचे योगदान असल्याचे सांगून ते म्हणाले की, शासन उद्योगाला सक्षम करण्यासाठी प्रयत्नशील आहे. तर मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना व मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनांचा लाभ महिला व युवकांनी घ्यावा. सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगाचे देशाच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी उपस्थित भागधारकांना जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अमोल बळे, अनिल जाधव, सनक दास, इंडियन पोस्टचे मोहन सोनटक्के, ईवाय कन्सल्टन्सीचे अमोल मोहिते, जिल्हा अग्रणी बँक प्रबंधक दास यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यशाळेला जिल्ह्यातील नवउद्योजक व उद्योग करू इच्छिणारे नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी उद्योग व्यवसायाशी संबंधित विविध प्रश्न विचारून आपल्या शंकांचे समाधान केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आशिष लगाडे यांनी केले.

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना ही राज्य सरकारची अतिशय महत्त्वकांक्षी योजना असून युवा व उद्योग क्षेत्रासाठी ही महत्त्वाची योजना आहे. युवाकांना रोजगार व नोकरी या योजनेतून उपलब्ध होणार आहे. उद्योगाला या योजनेतून मनुष्यबळाची उपलब्धता होण्यास मदत होणार आहे. तर अडीच कोटी १८ ते ३५ वयोगटातील युवा डोळ्यासमोर ठेवून ही योजना सुरू केली आहे. प्रत्येक शासकीय कार्यालयात एकूण मंजूर पदाच्या ५ टक्के जागा भरण्यात येणार आहेत. जिल्ह्याला २ हजार मनुष्यबळ शासकीय यंत्रणेला त्यामधून उपलब्ध होणार आहे. तर ६ महिने त्याला निर्वाह भत्ता शैक्षणिक पात्रतेनुसार त्याच्या खात्यात जमा होणार आहे. ६ महिन्यांच्या कामाचा अनुभव या योजनेतून मिळणार असल्याचे प्रभारी सहाय्यक आयुक्त गुरव यांनी सांगितले.




यशवंत म्हणाले की, केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजनांची माहिती एकाच व्यासपीठावर मिळावी हा या कार्यशाळेचा उद्देश आहे.या कार्यशाळेच्या माध्यमातून जिल्ह्यात विविध उद्योग व्यवसाय सुरू करण्यास प्रोत्साहन मिळणार असून या उद्योगातून रोजगार निर्मितीला मदत होणार आहे. सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगाचा अनेकांनी लाभ घ्यावा. सुधारित बीज भांडवल योजना जिल्हा उद्योग केंद्राकडून राबविण्यात येते. जिल्हा उद्योग मित्र ही एक संकल्पना आहे.एखादा उद्योग बंद पडला असेल तर त्याच्या पुनर्वसनाला चालना देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच जिल्ह्यातील उत्पादित वस्तूंच्या विक्रीला चालना देण्यात येईल असे सांगून ते म्हणाले की, मैत्री अंतर्गत १५१ सेवा अधिग्रहित करण्यात आल्या आहेत. उद्योग घटकाला चालना देण्याचे काम जिल्हा उद्योग केंद्र करत असल्याचे त्यांनी नमूद केले. तर वेगवेगळ्या उद्योगाला चालना देण्यासाठी लाभार्थी उद्योजकास अनुदान देण्यात येते. उद्योजक घडविण्याचे काम या विभागाकडून करण्यात असून सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग अंतर्गत आपल्या उद्योगाची नोंदणी करावी, असे आवाहन त्यांनी केले.

प्रदीप दळवी म्हणाले की, मैत्री पोर्टलच्या माध्यमातून विविध परवानगी दिल्या जातात. मैत्रीच्या एक खिडकी योजनेतून विविध उद्योग व्यवसायाला परवानगी देण्याचे काम केले जाते. १५ विभागांच्या ११९ परवानग्या मैत्री कक्षामार्फत दिल्या जातात. परवानग्या देण्यासाठी मैत्री कक्षाकडून पाठपुरावा करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

# संपादकीय

## पावसाचे तांडव

पावसाने गेल्या काही दिवसांपासून चांगलीच हजेरी लावली. मुंबई शहर, उपनगर, कल्याण-डोंबिवली, ठाणे, उल्हासनगर, मीरा-भाईंदर, वसई, विरार, अंबरनाथ-बदलापूर, कर्जत-कसारा, नवी मुंबई, पनवेल, उरण, खोपोली, खंडाळा घाट, माळशेज घाट परिसर, ठाणे ग्रामीणसह कोकण, पुण्यालाही पावसाने चांगलेच झोडपले आहे. महाराष्ट्राच्या काही ग्रामीण भागामध्येही पावसाच्या तांडवाचे चित्र पाहावयास मिळत आहे. अजूनही महाराष्ट्राच्या काही ग्रामीण भागामध्ये पावसाने आता कुठे सुरुवात केली आहे. पाऊस वेळेवर न पडल्याने, सुरुवातीच्या काळात दडी मारल्याने शेतकऱ्यांना दुबार पेरणी करण्याची वेळ आली. मुंबई शहर व उपनगरामध्ये पाऊस गेल्या काही दिवसांपासून पडत असल्याने जनसामान्यांचे जीवनमान विस्कळीत झाले आहे.

मुंबईकरांची लाईफलाईन असलेली रेल्वे सेवा काही दिवसांपासून संथ गतीने सुरू आहे. रेल्वे रुळावरही ठिकठिकाणी पाणी साचलेले व रेल्वे गाड्या काही ठिकाणी उभ्या असल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे. मुसळधार पावसातही मुंबईचे जीवनमान पूर्णपणे थांबले नसून हळू-हळू मार्गाक्रमण करत आहे. पावसामुळे राज्याच्या ग्रामीण भागातील कानाकोपऱ्यांतून तसेच परराज्यातून मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये विक्रीसाठी येणाऱ्या फळे-भाज्यांच्या आवकावरही परिणाम झाला आहे. आवक मंदावल्याने भाज्यांच्या किमतीतही वाढ झाली आहे. मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या तलावातील पाणीसाठा आटल्याने काही दिवस मुंबईकरांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत होता. पावसाने दडी मारल्याने मुंबईकरांवर पाणीकपातीची टांगती तलवार होती; परंतु गेल्या काही दिवसांपासून पडत असलेल्या संततधार पावसामुळे मुंबईकरांपुढे उभे ठाकलेली पाणीबाणीची समस्या आता पूर्णपणे संपुष्टात आलेली आहे. सततच्या पावसामुळे मुंबईकरांना पाणीपुरवठा करणाऱ्या तलावाच्या पाणीसाठ्यातही कमालीची वाढ झाली आहे. मुंबईकरांना ज्या सात तलावांतून पाणीपुरवठा केला जातो, त्यातील तुळशी व तानसा ही दोन्ही धरणे आताच ओव्हरफ्लो' होऊन वाहू लागली. अजून पाऊस सव्वा दोन महिने राहण्याची शक्यता असल्याने पाण्याच्या बाबतीत मुंबईकर आता निर्धास्त झाले आहेत. हे चित्र केवळ मुंबईतच नाही तर मुंबईलगत असलेल्या ठाणे, नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली, वसई-विरार व लगतच्या अन्य शहरी भागातही होते, पण सतत पडणाऱ्या पावसाने त्यांनाही दिलासा दिल्याने पाण्याच्या बाबतीत त्यांचे चेहरे उजळलेले दिसून येत आहेत.

कोकणात दरवर्षीच पाऊस पडतो. घरातील एखाद्या लाडक्या मुलाचे गोडकौतुक व्हावे, तशाच स्वरूपात पाऊस कोकण भागावर वर्षाव करत असतो; परंतु कोकणात पावसाचे पाणी जमिनीतच जिरवण्याचे, तलाव-धरणे बांधण्याचे राज्य सरकारकडून प्रयोजनच केले जात नसल्याने या पडणाऱ्या पावसाचा वर्षानुवर्षे कोकणवासीयांना फारसा फायदा होत नाही. पावसाचे पाणी वाहून जाते. हे पाणी जमिनीतच जिरवण्यासाठी कोकणवासीयांनी प्रयत्न केल्यास कोकणच्या जमिनीतील पाण्याच्या पातळीत वाढ होईल. पाण्याची वाढलेली पातळी पिण्याच्या पाण्यासाठी व तेथील शेतीसाठी उपयुक्त ठरेल. त्यामुळे कोकणात रिक्त असलेल्या जागांवर त्या त्या तालुक्यातील जनतेने तलाव, बंधारे तयार करण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. मध्यंतरी नदीजोड प्रकल्पाबाबत प्रशासकीय पातळीवर चर्चा झाली होती. वाजपेयी सरकारच्या काळात प्रशासकीय पातळीवर नदीजोड प्रकल्पाच्या कामाला गती मिळाली होती, परंतु पुढे त्या योजनेला गतीच मिळाली नाही.

गेल्या काही दिवसांपासून संततधार पडणाऱ्या पावसामुळे रेल्वे प्रवाशांचे अतोनात हाल होत आहेत. रेल्वे स्टेशनवर आल्यावर रेल्वेचे बिघडलेले वेळापत्रक, रेल्वेगाड्यांना होणारा विलंब, रेल्वेत बसल्यावर कोठे तरी मध्येच रेल्वेचे बराच वेळ थांबणे हा त्रासही पावसाळा कालावधीत मुंबईकर रेल्वे प्रवाशांच्या अंगवळणी पडलेला आहे. रेल्वे स्टेशनवर गर्दी, गर्दीतच करावा लागणारा दररोजचा प्रवास, प्रवासातच जाणारा चार-पाच तासांचा वेळ हे पाहिल्यावर मुंबईला ये-जा करणाऱ्या दररोजच्या रेल्वे प्रवाशांच्या संयमाची खरोखरीच प्रशंसा करायला हवी. रेल्वे स्टेशनबाहेर पडल्यावर साचलेल्या पाण्यातूनच ये-जा करणे एकप्रकारचे अग्निदिव्यच असते. रूळ परिसरात असणाऱ्या नाल्याच्या सफाईवरून महापालिका व रेल्वे प्रशासन नेहमीच एकमेकांवर दोषारोप करत असते. तुंबलेल्या नाल्याची, रेल्वे रुळावर साचलेल्या पाण्याची जबाबदारी कोणीही स्वीकारत नाही. यामध्ये हाल केवळ रेल्वे प्रवाशांचेच होतात. बसेसचा प्रवासही एक प्रकारचे आव्हानात्मक कार्य आहे. बसेसलाही विलंब होत असतो. पावसामध्ये बससाठी थांब्यावर उभे राहिल्यावर भरून येणारी बस ही थांब्यावर न थांबल्यावर प्रवाशाची होणारी अवस्था ही सहन होत नाही आणि सांगताही येत नाही अशा स्वरूपाची असते. पावसाच्या पाण्यात सतत भिजल्यामुळे आजारी पडणे, साथीच्या आजारांची लागण होणे या प्रकाराचाही मुंबईकरांना सामना करावा लागत आहे. त्यातच डोंगराळ भागात राहणाऱ्या, दरड प्रवण भागात राहणाऱ्या, धोकादायक इमारतीत राहणाऱ्या लोकांच्या डोक्यावर पावसाळा कालावधीत मृत्यूची टांगती तलवार कायम असते.

पालिकेने या धोक्याची वारंवार लेखी सूचना देऊनही आर्थिक कारणास्तव इतरत्र सोय न झाल्याने आहे त्याच ठिकाणी त्यांना वास्तव्य करावे लागत आहे. कल्याणमध्ये भूस्खलनामुळे घरे कोसळण्याची घटना घडलेली आहे. घाटकोपर खंडोबाचा डोंगर, विक्रोळीतील पार्क साईट येथील डोंगरभागावर असलेली चाळीतील घरांवर मृत्यूची आजही टांगती तलवार आहे. ठाणे जिल्ह्यात पडत असलेल्या पावसामुळे दुपारच्या सत्रातील शाळा न भरवण्याची घोषणा करण्याची वेळ प्रशासनावर आली. मुंबईपाठोपाठ गुरुवारी पुण्यातही पावसाचे तांडव सुरूच होते. मुसळधार पावसामुळे पुण्याला रेड अलर्ट जाहीर करण्यात आला आहे. पुण्यात मुसळधार पावसामुळे अनेक रस्त्यांना नद्यांचे स्वरूप आले असून अनेकांच्या घरात पाणी शिरले आहे. काही भागात जनजीवन देखील विस्कळीत झाल्याचे पाहायला मिळत आहे. लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यासाठी प्रशासन कामाला लागलं आहे. पुण्यात वरुण राजाचा उद्रेक पाहिल्यावर प्रशासनाला फिल्डवर जाऊन काम करण्याचे आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत.

# महिला, आरोग्य महिला, युवतींसाठी हात सैल



अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्पाच्या सुरुवातीला गरीब, महिला, तरुण आणि शेतकरी यावर लक्ष केंद्रित केले जाईल, असे सांगितले होते. अर्थसंकल्पातही हे दिसून आले. तरुण, महिला आणि नोकरदारांना थेट लाभ मिळवून देण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले आहेत. कोणत्याही सरकारी योजनेचा लाभ न घेतलेल्या अशा तरुणांना देशातील कोणत्याही संस्थेत प्रवेशासाठी शैक्षणिक कर्ज मिळेल. यातील तीन टक्के रक्कम सरकार देणार आहे. यासाठी सरकार दरवर्षी सुमारे एक लाख विद्यार्थ्यांना ई-व्हाऊचरची व्यवस्था करेल. तरुणांना आता स्वयंरोजगारासाठी २० लाख रुपयांपर्यंत मुद्रा कर्ज घेता येणार आहे. आतापर्यंत ही मर्यादा फक्त दहा लाख रुपये होती. पाच वर्षांच्या कालावधीत २० लाख तरुणांना कौशल्य प्रदान करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. हब आणि स्पोक व्यवस्थेच्या परिणामासह एक हजार आयटीआय अपग्रेड केले जातील. सरकार प्रायोजित निधीतून हमीसह ७.५ लाख रुपयांपर्यंत कर्जाची सुविधा देण्यासाठी मॉडेल स्किल लोन योजनेत बदल केला जाईल. महिला आणि मुलींसाठी अर्थसंकल्पात तीन लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे महिलांशी संबंधित योजनांना अधिक बळकटी मिळणार आहे.

महिला कर्मचारी संख्या वाढवण्यावर अर्थसंकल्पात भर देण्यात आला आहे. त्यासाठी स्वतंत्र प्रयत्न करण्याची घोषणा अर्थमंत्र्यांनी केली आहे. उद्योगाच्या मदतीने नोकरदार महिला वसतिगृहे बांधण्याची योजना आहे. याशिवाय पाळणाघरेही बांधण्यात येणार आहेत. गेल्या काही वर्षांमध्ये भारतीय राजकारणामध्ये महिलाकेंद्री तरतुदींचा सकारात्मक परिणाम बघायला मिळाला आहे. त्यातूनच अर्थमंत्र्यांना वरील नानाविध योजना सुचल्या असाव्यात असे मानायला जागा आहे.

सीतारामन यांनी, एनपीएस वात्सल्य' ही योजनादेखील जाहीर केली. या योजनेद्वारे आता पालकांना त्यांच्या अल्पवयीन मुलांच्या शिक्षणाची तसेच आपल्या वृद्धापकालीन पेन्शनची सोय करता येणार आहे. एनपीएस वात्सल्य ही योजना अल्पवयीन मुलांच्या भविष्यासाठी आर्थिक बचत करण्याच्या उद्देशाने जाहीर करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत पालक त्यांच्या अल्पवयीन मुलांच्या नावाने बँक खात्यात पैस जमा करू शकतील. तसेच त्याद्वारे राष्ट्रीय पेन्शन योजनेचा लाभ घेऊ शकतील. महत्त्वाचे म्हणजे १८ वर्षं पूर्ण झाल्यानंतर हे खाते मुलांच्या नावे हस्तांतरीत करता येणार आहे. १८ ते ७० वर्षं वयोगटातील प्रत्येक भारतीय नागरिकाला या योजनेचा लाभ घेता येणार आहे. मुलांच्या भवितव्यासाठी या योजनेचा उपयोग होईल. महिलांमध्ये कर्करोगाचे प्रमाण जास्त आहे. आरोग्याच्या समस्या त्यांनाच जास्त भेडसावतात. आर्थिक सर्वेक्षणात निरोगी आहार आणि मानसिक आरोग्यावर लक्ष केंद्रित करण्याची गरज व्यक्त केली होती. संसदेत मांडण्यात आलेल्या आर्थिक सर्वेक्षण २०२३-२४ मध्ये म्हटले आहे की, सरकारने निरोगी आहार आणि मानसिक आरोग्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

तज्ज्ञांच्या मते, मानसिक आरोग्य ही एक समस्या आहे. त्याकडे कमी लक्ष दिले जाते; मात्र सरकारने या संदर्भात कोणतीही घोषणा केली नाही.

आरोग्य आणि शिक्षणासंदर्भातील तरतुदींचा फारसा उल्लेख नसला तरी मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी यावेळच्या अर्थसंकल्पात काही मोठे निर्णय घेतले जाण्याची शक्यता तज्ज्ञांना होती. सीतारामन यांनी अर्थसंकल्पादरम्यान कॅन्सरग्रस्तांना मोठा दिलासा दिला आहे. सरकारने कॅन्सरच्या तीन औषधांवरील सीमाशुल्क हटवण्याची घोषणा केली आहे. कर्करोगाच्या उपचारात वापरलेली काही कर्करोगाची औषधे आणि उपकरणे स्वस्त होतील. याचा थेट लाभ रुग्णांना मिळण्याची अपेक्षा आहे. विशेष म्हणजे कॅन्सरची समस्या झपाट्याने वाढत असून त्यावर उपचार आणि औषधांवर होणाऱ्या खर्चामुळे सर्वसामान्यांच्या खिशावर मोठा भार पडत आहे. अर्थमंत्री निर्मला यांनी टप्प्याटप्प्याने उत्पादन कार्यक्रमांतर्गत वैद्यकीय क्ष-किरण मशीनमध्ये वापरण्यासाठी एक्स-रे ट्यूब आणि फ्लॅट पॅनेल डिटेक्टरवरील आयात शुल्क काढून टाकण्याची घोषणा केली आहे.-प्रा. मुक्ता पुरंदरे

# कोलेस्ट्रॉल वाढल्यानंतर शरीराच्या या भागांमध्ये होतात तीव्र वेदना



चुकीची जीवनशैली आणि अयोग्य आहाराच्या सवयी यामुळे अनेक आरोग्यासंबंधीच्या व्याधी आपल्या मागे लागतात. यामधील एक समस्या म्हणजे हाय कोलेस्ट्रॉल. आजकाल तरूण वयात देखील ही समस्या मोठ्या प्रमाणात दिसून येतेय.

कोलेस्ट्रॉल हा आपल्या रक्तात आढळणारा एक चिकट पदार्थ असतो. आपल्या शरीरात दोन प्रकारचे कोलेस्ट्रॉल असतात. यामधील पहिलं चांगलं कोलेस्ट्रॉल आणि दुसरे वाईट कोलेस्ट्रॉल.तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार, शरीराच्या चांगल्या कार्यासाठी चांगले कोलेस्ट्रॉल आवश्यक आहे. याउलट दुसरीकडे खराब कोलेस्ट्रॉल शरीरासाठी हानिकारक मानलं जातं. जेव्हा शरीरात खराब कोलेस्टेरॉलची पातळी वाढते तेव्हा ते रक्तवाहिन्यांमध्ये जमा होण्यास सुरुवात होतं आणि रक्तवाहिन्या ब्लॉक करतात. त्यामुळे हृदयविकाराचा झटका, स्ट्रोक आणि हृदयाशी संबंधित इतर गंभीर आजारांचा धोका वाढतो. मात्र जर एखाद्या व्यक्तीच्या शरीरात वाईट कोलेस्टॉलटी पातळी वाढली असेल तर शरीरातील काही भागांमध्ये अचानक वेदना जाणवू लागतात. ही लक्षणं काय आहेत, ती जाणून घेऊया.

पाठीमध्ये वेदना होणं

कोलेस्ट्रॉल वाढल्याने पाठीच्या खालच्या भागात तीव्र वेदना होऊ शकतात. ज्यावेळी रक्तातील कोलेस्ट्रॉलची पातळी वाढते तेव्हा पाठीच्या खालच्या भागात वेदना होऊ शकतात.

जबड्यात वेदना होणं


जर तुम्हाला अनेक दिवसांपासून जबड्यात दुखत असेल तर त्याकडे दुर्लक्ष करू नका. हे उच्च कोलेस्ट्रॉलचं लक्षण असू शकतं. जेव्हा रक्तवाहिन्यांमध्ये कोलेस्टेरॉल जमा होतं त्यावेळी जबड्यातील रक्ताभिसरण ब्लॉक होतं. अशावेळी जबडा आणि मान मध्ये वेदना जाणवू शकतं.

छातीत वेदना होणं

शरीरातील कोलेस्ट्रॉल वाढल्यामुळे छातीत दुखू शकतं. यामध्ये हृदयाला रक्तपुरवठा करणाऱ्या नसांमध्ये वाईट कोलेस्ट्रॉल जमा झाले की, रक्ताभिसरण प्रभावित होते. यामुळे तुम्हाला छातीत दुखू शकतं.

पायांमध्ये वेदना होणं-शरीरातील कोलेस्ट्रॉलची पातळी वाढल्यामुळे पाय दुखू शकतात. रक्तवाहिन्यांमध्ये कोलेस्ट्रॉल जमा झाल्यामुळे पायांच्या रक्तवाहिन्या आकुंचन पावतात, ज्यामुळे पाय दुखतात. यावेळी पायांमध्ये इतक्या वेदना होऊ शकतात की, व्यक्तीला चालणंही कठीण होतं. जर तुम्हाला अशी लक्षणे दिसली तर तुम्ही ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

# रात्रीची कमी झोप तुम्हाला पाडतेय आजारी? या एका चुकीमुळे बळावतोय मधुमेहाचा धोका!




अभ्यासानुसार, ज्या लोकांचा झोपेचा कालावधी सरासरी ३१ ते ४५ मिनिटांपर्यंत बदलतो. या व्यक्तींमध्ये मधुमेहाचा धोका १५% वाढल्याचं दिसून आलं. त्याच वेळी, ज्या लोकांच्या झोपेचा कालावधी एका तासापेक्षा जास्त असतो, त्यांच्यामध्ये हा धोका ५९ टक्क्यांनी वाढल्याचं पाहायला मिळालं.रात्रीची कमी झोप तुम्हाला पाडतेय आजारी? 'या' एका चुकीमुळे बळावतोय दिवसभर काम करून थकवा आल्यानंतर प्रत्येक व्यक्तीसाठी आराम हा गरजेचा असतो. आपल्या आरोग्यासाठी झोप ही फार गरजेची असते. आपल्या शरीरासाठी झोप ही फार महत्त्वाची असते. पण तुम्हाला माहितीये निद्रानाश किंवा झोपेचा त्रास मधुमेहाचा धोका वाढवू शकतो? एका नवीन अभ्यासात असं आढळून आलंय की, की ज्या लोकांच्या झोपेच्या कालावधीत वारंवार बदल होत असतात त्यांना मधुमेह होण्याचा धोका वाढतो.

काय नमूद केलंय नव्या अभ्यासात?

अभ्यासानुसार, ज्या लोकांचा झोपेचा कालावधी सरासरी ३१ ते ४५ मिनिटांपर्यंत बदलतो. या व्यक्तींमध्ये मधुमेहाचा धोका १५% वाढल्याचं दिसून आलं. त्याच वेळी, ज्या लोकांच्या झोपेचा कालावधी एका तासापेक्षा जास्त असतो, त्यांच्यामध्ये हा धोका ५९ टक्क्यांनी वाढल्याचं पाहायला मिळालं. हा अभ्यास णघ इळेलरपज्ञ मधील ८४,००० हून अधिक व्यक्तींना यामध्ये सहभागी करण्यात आलं होतं. सहभागींनी सात रात्री एक एक्सेलेरोमीटर घातला, ज्यामुळे त्यांच्या झोपण्याच्या पद्धतींचे परीक्षण केलं जाऊ शकतं.

कमी झोपणाऱ्यांना अधिक धोका

या अभ्यासात असंही म्हणण्यात आलंय की, जे लोक कमी किंवा जास्त झोपतात त्यांना मधुमेहाचा धोका वाढतो. जास्त झोपलेल्या लोकांमध्ये हा धोका ३४% वाढल्याचं पाहायला मिळालं. झोपेची कमतरता आणि मधुमेह यांच्यातील संबंध दर्शविणारा हा पहिला अभ्यास नाही. गेल्या काही वर्षांत, अनेक अभ्यासांनी हे सिद्ध झालं आहे की, झोपेच्या कमतरतेमुळे रोगप्रतिकारशक्ती कमकुवत होते आणि उच्च रक्तदाब, लठ्ठपणा, नैराश्य आणि हृदयविकार यासारख्या समस्यांचा धोका वाढतो.

तज्ज्ञांचा कधी घ्यावा सल्ला?

जर तुम्हालाही झोपेच्या समस्येचा सामना करावा लागत असेल तर तुम्ही सावधगिरी बाळगली पाहिजे. नियमित झोप येण्यासाठी तुम्ही काही उपाय करू शकता, जसं की, झोपण्याची ठराविक वेळ ठेवणं, झोपण्यापूर्वी फोनचा वापर कमी करणं आणि झोपण्यासाठी आरामदायक वातावरण तयार करणं. जर तरीही तुम्हाला झोपेच्या समस्या जाणवत असतील तर तुम्ही तज्ज्ञांचा सल्ला घेतला पाहिजे.

# राशी भविष्य



साप्ताहिक राशिभविष्य
दि. २८ जुलै २०२४ ते ३ ऑगस्ट २०२४
.........................

मेष : महत्वाचे निर्णय घेण्यास व्यवसायातील महत्वाचे करार-मदार करण्यास आजचा दिवस चांगला आहे. संततीसौख्य लाभेल. मुलामुलींसंदर्भात एखादी भाग्यकारक घटना घडेल. त्यांचे काही प्रश्न असल्यास ते मार्गी लावाल. आर्थिक लाभाचेदृष्टीने एखादी नवी योजना नजरेसमोर येईल. व्यवसायात नवीन कल्पना अंमलात आणू शकाल.

वृषभ : महत्वाची आर्थिक कामे उकरण्यास दिवस चांगला आहे. उधारी, जुने येणे वसूल होईल. कर्जप्रकरण मंजूर होईल. व्यवसायात मोठे आर्थिक व्यवहार करू शकाल. पत्नीचा सल्ला लाभदायक ठरेल. आरोग्य उत्तम राहील. नोकरीमध्ये पगारवाढीची बातमी समजेल. नोकर-चाकर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभेल.

मिथुन : व्यवसायाच्या जागेचे काही प्रश्न असतील तर ते मार्गी लावू शकाल. मन प्रसन्न व आनंदी राहील. लोकांचे सहकार्य लाभेल. नोकरी-व्यवसायात उत्तम ास्थिती राहील. मित्र-मंडळींचे सौख्य लाभेल. आरोग्य उत्तम राहील. नवीन स्नेहसंबंध जुळतील.

कर्क : आजचा दिवस हा संधी मिळण्याच्या दृष्टीने अत्यंत संस्मरणीय असा आहे. आरोग्य उत्तम राहील. तुमच्या कार्यक्षेत्रात तुम्हाला एखादी सुसंधी मिळेल. नवीन स्नेहसंबंध जुळतील. प्रवासाचे योग येतील. एखादी भाग्यकारक घटना घडेल. अपेक्षित पत्रव्यवहार होईल.

सिंह : आज तुम्हाला व्यवसायानिमित्त व नोकरीनिमित्त एखादा छोटासा प्रवास करावा लागेल. अपेक्षित पत्रव्यवहार होईल. अपेक्षित गाठीभेटी पडतील. तुमची जिद्द, चिकाटी वाढेल. नातेवाईकांचे उत्तम सहकार्य लाभेल. मनोबल वाढीस लागेल. आरोग्य उत्तम राहणार आहे. नवीन परिचय होतील. तुमच्या कार्यक्षेत्रात तुम्हाला सुसंधी लाभेल.

कन्या : व्यवसायाच्या दृष्टीने आजचा दिवस पर्वणीचा ठरणार आहे. व्यवसायामधील उलाढाल वाढवू शकाल. नवीन हितसंबंध, नवीन गिऱ्हाईक जोडू शकाल. नोकरीमध्येही आज आपण उत्साहाने कार्यरत राहणार आहात. गाठीभेटी पडतील. तुमच्या मतांना तुमच्या विचारांना प्राधान्य दिले जाईल. तुमच्या व्यक्तीमत्वाचा प्रभाव वाढेल. मात्र आग्रहीपणा टाळावयास हवा.

तुळ : दिवस फारसा अनुकूल नाही. तरीही जिद्दीच्या जोरावर तुम्ही तुमची आजची कामे पार पाडू शकाल. वाहने जपून व सावधानतेने चालवावीत. प्रवास टाळावेत. महत्वाचे निर्णय नकोत. काहींची अध्यात्मिक प्रगती होईल.

वृश्चिक : महत्वाचे निर्णय घेण्यास तसेच आगामी काळाचे नियोजनास दिवस अनुकूल आहे. आज पूर्ण दिवस तुम्ही उत्साहाने व उमेदीने कार्यरत राहणार आहात. आरोग्य उत्तम राहील. व्यवसायात नवीन बाजारपेठ मिळवू शकाल. नवीन हितसंबंध निर्माण होतील. अपेक्षित गाठीभेटी पडतील.

धनु : आरोग्याच्या थोड्याफार तक्रारी जाणवतील. आज तुम्हाला गाडी, नोकर-चाकर, हाताखालील कर्मचाऱ्यांचे उत्तम सहकार्य लाभेल. व्यवसायात उत्तम ास्थिती राहील. काहींची अध्याात्मिक प्रवृत्ती प्रवृत्ती वाढीस लागेल. विरोधक व हितशत्रूंचे मनसुबे हाणून पाडण्यात यशस्वी व्हाल.

मकर : आज तुम्हाला महत्वाच्या आर्थिक कामांत पत्नीचा सल्ला उपयोगी ठरणार आहे. वैवाहिक सौख्य उत्तम लाभेल. मित्रांचे सहकार्य उत्तम लाभेल. अपेक्षित गाठीभेटी पडतील. उत्साह व उमेद वाढेल. प्रवास सुखकर होतील. नोकरी-व्यवसायात उत्तम ास्थिती राहील.

कुंभ : आजचा दिवस हा गाठीभेटी पडणं, नवीन हितसंबंध निर्माण होणे, नवीन परिचय होणे या दृष्टीने खूपच अनुकूल आहे. मित्रांचे अपेक्षित सहकार्य मिळेल. महत्वाचा पत्रव्यवहार वा महत्वाचे फोन येतील. व्यवसायामध्ये नवीन हितसंबंध निर्माण करू शकाल. मोठ्या लोकांशी ओळखी होतील. तसेच महत्वाच्या गाठीभेटी पडतील. आरोग्य उत्तम राहील. हाताखालील गडी, नोकर चाकर यंचे उत्तम सहकार्य लाभेल. आर्थिक लाभ होतील.

मीन : सध्या आपणाला नातेवाईकांचे सहकार्य मिळणार नाही, हे गृहितच धरावयास हवे. नातेवाईकांशी मतभेदाची शक्यता आहे. मानसिक अस्वास्थता जाणवेल. प्रकृतीकडे लक्ष द्यावयास हवे. प्रवास शक्यतो टाळावेत. वाहने सावकाश व जपून चालवावीत. तुमची चीडचीड होणार आहे.

२८ जुलैला जन्मलेल्या लोकांचा भविष्य

स्वभाव : तुमच्या जन्मतारखेवर चंद्र, शनी व सूर्याचा दुहेरी प्रभाव आहे. तुम्ही मनाने संवेदनशील आहात. इतरांबल तुम्हाला विलक्षण प्रेम, आपुलकी, माया वाटते. त्यांची दु:खे कमी करण्यासाठी तुम्ही सर्वतोपरी प्रयत्न करता. तुमच्याकडे उत्साहाचा प्रचंड साठा आहे. त्यामुळे इतरांनाही स्फूर्ती मिळते. तुमची आकलनशक्ती उत्तम आहे. समस्येचा उलगडा तुम्हाला चटकन होतो. तुम्ही दूरदर्शी आहात. चिकाटी व सातत्याने तुम्ही समाजात काही आदर्श प्रस्थापित व्हावेत. नीतिमूल्यांना बैठक मिळावी यासाठी सतत झटत असता. आपल्यालाच सर्व काही कळते हा भ्रम मनातून काढून टाका. हे युग विशेषज्ञांचे असल्याने त्या त्या क्षेत्रातील तज्ज्ञांचे, जाणकारांचे मार्गदर्शन घेणे फायदेशीर ठरेल. अतिश्रम, बौध्दिक ताण टाळा. नाहीतर डोकेदुखी, डोळ्यांचे विकार होतील. सूर्यनमस्काराचा व्यायाम आवश्यक.

कार्यक्षेत्र : माणसाच्या कार्यक्षमतेत येणारे अडथळे दूर करून तिची पातळी कशी उंचावयाची याचे सम्यक ज्ञान असल्याने व्यवस्थापनात उत्कृष्ट कामगिरी करू शकाल. व्यवसाय व्यवस्थापन, औद्योगिक, व्यवस्थापन, आयात निर्यात व्यवस्थापन या क्षेत्रातील पदवी हस्तगत करा. शासकीय सेवेत चटकन प्रवेश मिळेल. खाजगी कंपन्यातही संचालक मंडळापर्यत वाटचाल करू शकाल. नाटक, चित्रपट, दूरदर्शन या क्षेत्रातही नावलौकिक मिळेल.

प्रणयी जीवन : आपला जिवलग आपल्यासारखाच सहृदय उदार अंत:करणाचा असावा अशी तुमची अपेक्षा असते. आपण समाजात आदर्श प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न करतो त्याची त्याने कदर करावी, टवाळी करू नये असे तुम्हाला वाटते. कोत्या, संकुचित, कंजूष वृत्तीची माणसे तुम्हाला आवडत नाहीत. जुलै २१ ते ऑगस्ट २१ दरम्यान जन्मलेल्या व्यक्ती या अपेक्षा पूर्ण करतील. वर्षफळ : उत्कर्षाकडे वेगाने वाटचाल करू शकाल. व्यासंग व जुन्या प्रकरणांचा अभ्यास समस्या सोडवण्यासाठी मदत करील. जुलै ऑगस्ट मध्ये व्यवसायात संघर्षाचे, असहकाराचे वातावरण राहील. सप्टेंबर ऑक्टोबर मध्ये आकर्षक व्यक्तींशी संबंध प्रस्थापित होतील. डिसेंबर जानेवारी मध्ये विरोधकांवर मात करणे सोपे जाईल. मार्च एप्रिल मध्ये सत्तेची सूत्रे, जबाबदारी सोपविण्यात येईल. मे जून मध्ये शेतीवाडीतून भरघोस उत्पन्न मिळेल.

महत्वाचे वर्ष : १, १०, १९, २८, ३७, ४६, ५५, ६४, ७३. भाग्यरत्न : माणिक

याच तारेखेची व्यक्ती : सर गारफील्ड सोबर्स, ह्युगो चावेझ

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिध्द झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे**, संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** ईमेल : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com

# भारताचे पहिले पदक निश्चित, तिरंदाजीत मराठमोळ्या खेळाडूसह तिघांची दमदार कामगिरी, मोठी अडचण दूर, कारण...

पॅरिस ,२७ जुलै (पीएसआय) भारतानं पॅरिस ऑलिम्पिकमधील सुरुवात तिरंदाजीतील सहभागानं मोहीम सुरु केली आहे. तिरंदाजीच्या रँकिंग राऊंडमध्ये भारताच्या पुरुष आणि महिला संघानं टॉप ४ मध्ये स्थान मिळवत उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश मिळवला आहे. महिला आणि पुरुष संघांनी उपांत्यपूर्व फेरीत स्थान मिळवल्यानं देशातील नागरिकांच्या पदकाच्या आशा उंचावल्या आहेत. पुरुष संघाची पदक मिळवण्याची शक्यता जास्त आहे कारण तिरंदाजीतील पहिल्या स्थानावर असलेल्या दक्षिण कोरियाच्या संघासोबत भारताचा सामना होणार नाही. धीरज बोम्मादेवरा, तरुणदीप राय आणि प्रवीण जाधव यांनी २०१३ गुण मिळत तिसऱ्या स्थानी झेप घेतला.भारताला तिसऱ्या उपांत्यपूर्व सामन्यात निश्चित करण्यात आलं आहे. भारताचा सामना तुर्की आणि कोलंबिया यांच्यातील विजेत्या संघासोबत होणार आहे. तुर्कीच्या संघानं ६ व्या तर कोलंबियानं ११ व्या स्थान मिळवलं होतं.१२ व्या स्थानावर असलेल्या संघाला उपांत्यपूर्वी फेरीपूर्वी एका सामन्यात विजय मिळवत टॉप ८ मध्ये स्थान मिळवावं लागतं.

भारताचं पदक निश्चित

भारताच्या संघाला पदक मिळू शकतं असं बोललं जातंय कारण अंतिम फेरीच्या लढतीपर्यंत भारताचा दक्षिण आफ्रिकेविरुद्ध सामना होणार नाही. भारतानं उपांत्यपूर्व फेरीत विजय मिळवल्यास त्यांचा सामना फ्रान्स, इटली किंवा कझाकिस्तान यांच्या विरुद्ध होईल. विशेष बाब म्हणजे वर्ल्ड कप फायनलमध्ये भारतानं दक्षिण कोरियाला पराभूत करत सुवर्णपदक जिंकलं होतं. तिरंदाजीमध्ये सुवर्णपदकासाठी मॅच २९ जुलै रोजी होणार आहे. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारताला पहिलं पदक तिरंदाजीमध्ये मिळू शकतं. दुसरीकडे महिला तिरंदाजीमध्ये भारताला पदक मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागू शकतो. दक्षिण कोरिया रँकिंग राऊडमध्ये पहिल्या स्थानावर आहे. उपांत्यपूर्व फेरीत विजय मिळवल्यास भारताचा उपांत्य फेरीत सामना बलाढ्य दक्षिण कोरियासोबत होणार आहे. भारताच्या महिला टीमनं तिरंदाजीत दमदार कामगिरी केली होती. दीपिका कुमारी, अंकिता भकत आणि भजन कौर यांनी भारताला १९८३ अंक मिळवून दिले.

दरम्यान, भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील हॉकी सामना भारतीय प्रमाण वेळेनुसार नऊ वाजता सुरु होणार आहे.

# राहुल द्रविडचा नव्या प्रशिक्षकाला खास मेसेज, गौतम गंभीर झाला भावूक, बीसीसीआयकडून व्हिडीओ शेअर

पल्लेकेले-रोहित शर्माच्या नेतृत्त्वात आणि राहुल द्रविडच्या मार्गदर्शनात भारतानं वेस्ट इंडिज आणि अमेरिकेत पार पडलेल्या टी २० वर्ल्ड कपमध्ये विजेतेपद मिळवलं होतं. भारतानं टी २० वर्ल्ड कप जिंकल्यानंतर रोहित शर्मा,विराट कोहली आणि रवींद्र जडेजानं निवृत्ती घेतली. राहुल द्रविडनं देखील मुख्य प्रशिक्षकपदावरुन टी २० वर्ल्ड कपनंतर पायऊतार होण्याचा निर्णय घेतला.आता भारत आणि श्रीलंका यांच्यात आजपासून टी २० मालिका सुरु होत आहे. या टी २० मालिकेपासून मुख्य प्रशिक्षक म्हणून गौतम गंभीरचा कार्यकाळ सुरु होत आहे. यानिमित्ताने गौतम गंभीरला राहुल द्रविडने खास मेसेज देत प्रशिक्षकपदाचा कार्यभार सोपवला आहे.

भारत आणि श्रीलंका यांच्यातील टी २० मालिकेला आजपासून सुरुवात होत आहे. या मालिकेपूर्वी राहुल द्रविडनं गौतम गंभीरला खास मेसेज करत कोचिंगची जबाबदारी सोपवली आहे. बीसीसीआयनं जो व्हिडीओ शेअर केला आहे त्यात गौतम गंभीर एका लॅपटॉपसमोर बसलेला आहे. त्यामध्ये तो एक बटन दाबतो आणि राहुल द्रविडच्या मेसेज सुरु होत असल्याचे पाहायला मिळते.राहुल द्रविडनं त्याच्या मेसेजची सुरुवात करताना हॅलो गौतम, तुझं आमच्या जगातील सर्वात रोमांचक कामात स्वागत आहे, असे म्हटले. भारतीय क्रिकेट टीमच्या कोचचा कार्यकाळ पूर्ण करुन तीन आठवले संपले आहेत, असे राहुल द्रविड म्हणतो. द्रविडने यामध्ये बारबाडोसमधील अंतिम फेरीनंतरचा विजयाचा जल्लोष आणि मुंबईतील विजयी परेड अविस्मरणीय असल्याचे म्हटले.राहुल द्रविडनं गौतम गंभीरला शुभेच्छा देत भारतीय टीमला मोठ्या उंचीवर नेशील, असं म्हटलं. तुझ्यासोबत खेळाडू म्हणून खेळताना मैदानावर तुला सर्वश्रेष्ठ योगदान देताना पाहिलं आहे. तुला फलंदाज आणि क्षेत्ररक्षक म्हणून दृढनिश्चय आणि पराभव न स्वीकारण्याची सवय पाहिले आहे, असे राहुल द्रविड म्हणाला. आयपीएलमध्ये तुला जिंकण्याची इच्छा, युवा खेळाडूंना सहकार्य आणि मैदानावर आपल्या टीमने सर्वश्रेष्ठ करण्यासाठी तुझी धडपड पाहिली आहे, असे राहुल द्रविड म्हणाला. भारतीय क्रिकेटसाठी तू किती समर्पित आणि भावनिक आहे हे मला माहिती असून नव्या जबाबदारीत देखील आणशील, असे राहुल द्रविड गौतम गंभीरला म्हटले. तुला माहिती आहे की अपेक्षा अधिक असणार आहेत, परीक्षा आणखी कठोर असणार आहे. तुला संघात पूर्णपणे फिट असलेले खेळाडू मिळतील त्यासाठी शुभेच्छा असं राहुल द्रविड म्हणाला.

## जाहीर प्रगटन

लातूर जिल्हयातील विशेषतः मौजे कोळपा, ता. जि. लातूर लातूर येथील सर्वे जनतेस या जाहिर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे पक्षकार १) सौ. उज्वला राचोटी स्वामी २) श्री. राचोटी चंद्रय्या स्वामी, दोघे रा. राघवेंद्र कॉलनी, लातूर यांनी अधिकृत केल्यावरुन व दाखविलेल्या कागदपत्रावरुन सर्वांच्या माहितीस्तव सदरील प्रगटन देण्यात येत आहे.

माझे पक्षकार यांना सौ. महादेवी पाराप्पा खानापुरे व संमती देणार पारप्पा विश्वंभर खानापुरे, रा. कोळपा, ता. जि. लातूर यांच्या मालकी व कब्जे वहिवाटीची मौजे कोळपा, ता. जि. लातूर येथील जमीन गट नंबर १४८/१ मधील एकूण क्षेत्र १ हे. ३७ आर आकार ५ रु.१६ पैसे मालकी क्षेत्र १ हे.३४ आर पैकी अंदाजे ० हे.११ आर. जमीन असुन याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस-गट नंबर १४८/१ पैकीचे श्री. राजेश्वर संग्राम खानापुरे यांच्या हिस्सेची जमीन, पश्चिमेस- गट क्र. १४६/१ पैकी श्री. नानासाहेब विश्वंभर खानापुरे यांच्या हिश्शेची जमीन, दक्षिणेस- लातूर रोड ते लातूर रेल्वे लाईन उत्तरेस- लिहुन घेणार यांचे मालकीचे गट क्र. १४८/१ पैकीचे क्षेत्र

येणे प्रमाणे वरील चतुः सिमेच्या आतील जमीन विक्री करण्याचा ठराव सौ. महादेवी पाराप्पा खानापुरे व संमती देणार पारप्पा विश्र्वंभर खानापुरे, रा. कोळपा, ता. जि. लातूर यांनी माझ्या पक्षकारासोबत केला असुन इसारापोटी काही रक्कम स्विकारलेली आहे. तसेच विद्यमान मालकाने सदर जमीनीवर कोणाचाही कर्ज बोजा, गहाणखत, न्यायालयीन वाद, वारसा हक्क, पोटगी हक्क, लिज, विक्रीचा करार, शेजाऱ्यांशी वाद अथवा इतर कसल्याही प्रकारचा वाद नसले बाबत जमीन मालकाने हमी दिली आहे. तरी सदरील जाहीर प्रगटन दिल्यापासुन १५ दिवसाच्या आत सदरील मिळकती बाबत इतर कोणाचेही हक्क संबंध, उजर, आक्षेप, हितसंबंध, कर्ज बोजा, गहाणखत, बक्षीसपत्र, कोर्टडिक्री, तारण, लिज, शेजाऱ्याशी वाद शासकीय किंवा निमशासकीय कर्ज बोजा, न्यायालयीन वाद, इत्यादी प्रकारच्या हरकती असल्यास माझ्याकडे योग्य त्या कागदपत्रासह उजर / आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणाचा काही आक्षेप नाही आल्यास सदरील मिळकत निर्विवाद आहे असे समजुन आमचे पक्षकार खरेदीखताचा पुढील व्यवहार पुर्ण करतील याची नोंद घ्यावी. सदरील मुदतीनंतर आलेला आक्षेप आमचे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

सबब हे जाहिर प्रगटन.

तर्फे

**जाहिर प्रगटन देणार**
**ॲड. शोएब अशफाक चौधरी**
**मो.नं.७०६६५५५६९५**

## टी.सी हरवली आहे

माझी महाजन संमेश्वर सोमनाथ या नावाची LPSS Law नापासची टि.सी दि.२०/०७/२०२४ रोजी उदगीर ते लातूर बस प्रवासात हरवली आहे. जर कोणास सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधवा.
मो.नं. ९५२९३२६३२९

## तालूका दंडाधिकारी तथा तहसिलदार उदगीर यांचे कार्यालय

(दंडणिय विभाग)

जा.क्र. २०२४/एमएजी/कावि दि. ११/०७/२०२४

जाहीरनामा

ज्याअर्थी अर्जदार सय्यद मोईनोद्दीन असदउल्ला खतीब रा.उदगीर ता. उदगीर यांचा जन्म दिनांक १०/०७/१९५८ रोजी मौजे उदगीर ता. उदगीर येथे झाला असून जन्म/मृत्यु नोंदवहीला त्यांची जन्म नोंद करण्यात आलेली नाही. सदरील अर्जदार सय्यद मोईनोद्दीन असदउल्ला खतीब रा. उदगीर ता.उदगीर यांचा जन्म दिनांक १०/०७/१९५८ रोजीची नोंद जन्म नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात दिनांक ०८/०७/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांचा जन्म दिनांक १०/०७/१९५८ रोजी मौजे उदगीर ता. उदगीर येथे झाले बाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हनणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहू अर्जदार सय्यद मोईनोद्दीन असदउल्ला खतीब रा.उदगीर ता.उदगीर यांचा जन्म दिनांक १०/०७/१९५८ रोजीची नोंद मुख्याधिकारी, नगर परिषद उदगीर ता.उदगीर येथे जन्म नोंदवहीला नोंद घेणे बाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल.

आज दिनांक ११/०७/२०२४ रोजी दिले.
पुढे नेमलेली तारीख १२/०८/२०२४

तालूका दंडाधिकारी तथा,
तहसीलदार उदगीर

## कल्याण बाजार

| | | |
|---|---|---|
| १४९ | ४-६ | २६८ |
| २३९ | | ७९० |
| ४३-३४ | | ६८-८६ |

## मिलन नाईट बाजार

| | | |
|---|---|---|
| १४० | ५-७ | ११५ |
| २३० | | २२३ |
| ६८-८६ | | ७२-२७ |

गोल्डन विक्री चान्सेस

**प्रो. योगेश कुमार**
स्पेशल जोडी, सिंगल, पत्तीसाठी संपर्क साधावा.
संपर्क 99 93 94 16 69
98 98 20 38 88

## नशिबाची परिक्षा

गोल्डन विक्री चान्सेस

### मिलनम डे

कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:९-५-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 130 | ४-७ | 124 | जोड | 40-67-91-82-75 |
| 248 | | 467 | | |
| 220 | | 700 | | |

### कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:०-३-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 127 | ०-४ | 158 | जोड | 06-24-39-57-48 |
| 280 | | 680 | | |
| 460 | | 455 | | |

### मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | सिंगल:७-१-४ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| १७९ | ७-० | १४५ | जोड | 72-30-18-45-09 |
| २९८ | | २३५ | | |
| ३७७ | | ५५० | | |

संपर्क 99 75 47 98 26

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यात येते की, माझे पक्षकार नामे जाकीर यासीनसाब कासार रा. निडेबन ता. उदगीर यांनी सांगितलेवरून कागदपत्रे व माहीती देवून अधिकृत केल्यावरून सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्दीस देण्यात येते.

हे की, मौजे निडेबन ता. उदगीर जि. लातूर येथील ग्रामपंचायत मिळकत क.७०५, सर्वे क. २. प्लॉट क.११ क्षेत्रफळ ७०० चौरस फुट ज्याची चतुः सिमा पुर्वेस प्लॉट क्र. ११, पश्चिमेस : ठाकुर यांचा प्लॉट, दक्षिणेस : २० फुटाचा रस्ता व उत्तरेस : २० फुटाचा रस्ता येणेप्रमाणे वरील मिळकतीचे मालक जाकीर यासीनसाब कासार आहेत. सदरील मिळकतीचे मुळ खरेदीखत क. ८१३/१९९५ दिनांक १३-३-१९९५ हे हरवले आहे.

तरी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, वरील नमूद मिळकतीचे मुळ खरेदीखत क. ८१३/१९९५ दिनांक १३-३-१९९५ याची प्रत कोणास मिळाली असल्यास खालील नमूद जाहीर प्रगटण देणा-यास आणून दयावी सदरील मिळकतीचे डी. सी बी. बँक शाखा मादलापूर यांच्याकडे गहानखत करून देण्यात येत आहे.

सबब हे जाहीर प्रगटन दिनांक २७.०७.२०२४ रोजी प्रसिध्दीस दिले.

जाहीर प्रगटन देणार
जाकीर यासीनसाब कासार
रा. उदगीर मो.क. ८७८८७३६२९१

तर्फे
ॲड. एन. एल. मध्वरे,
उदगीर मो क ९४२२२४३५०७

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यात येते की, खाली वर्णन केलेली मिळकत ही श्री. शेख हुसेनबी शेस जिलानी, रा. समता नगर, उदगीर ता. उदगीर जिल्हा लातूर यांच्या मालकिची आहे. त्यांनी आमचे आशिल बँक इक्टिास स्मॉल फायनान्स बँक लि. शाखा उदगीर यांचेकडुन सदर मिळकतीवर रक्कम रुपये ३,००,०००/- (तिन लाख रुपये) कर्ज घेतलेले आहे. सदर मिळकतीवर त्यांनी आमच्या आशिल बँक इक्टिास स्मॉल फायनान्स बँक लि. शाखा उदगीर यांच्याकडुन घेतलेल्या कर्जासाठी दिनांक १९.०७.२०२४ रोजी दुय्यम निबंधक उदगीर मांच्याकडे ई-फायलिंग नंबर १५३/२०२४ अन्वये नोटीस ऑफ इंटिमेशन रितसर नोंदवुन दिलेले आहे. त्यांनी सदरची मिळकत निर्वेध व निजोसमी असल्याची आमच्या आशिल बँकेस खात्री व हमी दिलेली आहे अन्यजणांस कोणत्याही मार्गाने हस्तांतरीत केली नाही अशी खात्री व विश्वास दिलेला आहे. साठेखत, खरेदीदस्त, बक्षीसपत्र, मृत्युपत्र, गहान, दान, लिज, लायसेन्स अशा कोणत्याही दस्ताने व कराराने सदर मिळकतीत अन्य कोणाचेही हक्क हितसंबंध निर्माण झालेले नाहीत याची खात्री दिलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन :**

मौजे उदगीर येथील नगर परिषद मिळकत क. ४-१-२१३० प्लॉट क.९ सर्वे क. ३३५ क्षेत्र ११२५.०० चौ.फुट ज्याची चतुः सिमा

पुर्वेस - प्लॉट क १०
पश्मिस- प्लॉट क ८
दक्षिणेस - १८ फुट रोड
उत्तरेस - अहेमद चाउस यांची जमीन

वरील चतुः सिमेआतील जागा त्यातील सर्व तद्ंगभुत वस्तुसुध्दा ही जाहीर नोटीस दिली तारीख २७-०७-२०२४

अशिलातर्फे ॲडव्होकेट
ॲड. एन. एल. मध्वरे,
उदगीर मो क ९४२२२४३५०७

## जाहीर नोटीस

### सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर उदगीर यांच्या न्यायालयात,

विशेष दि.दा.क्र. ६४/२०२१ (गिरीष/नागनाथ)
प्रति, निशाणी ८१

१८. पल्लवी भ्र. प्रतिश इनामदार
वय २८ वर्षे, धंदा घरकाम
रा. निडेबन ता. उदगीर जि. लातूर

१९. प्रणव पि. प्रतिश इनामदार
वय ७५ वर्षे,
अज्ञान पालनकर्ता आई पल्लवी भ्र. प्रतिश इनामदार
रा. निडेबन ता. उदगीर जि.लातूर

सदर जाहिर नोटसव्दारे आपणास कळविण्यात येते की, अर्जदार गिरीष रंगनाथराव भोपाळे, रा. निडेबन ता. उदगीर जि. लातूर यांनी या न्यायालयात तुमच्या विरुध्द सदरचे प्रकरण दाखल केले आहे. त्या प्रकरणामध्ये तुम्ही गैरअर्जदार आहात.

तुम्हास बऱ्याचवेळा कोर्टामार्फत नोटीस काढली असता आपण बजावुन घेत नाहीत व सदर ठिकाणी आढळुन येत नाहीत म्हणुन अर्जदाराच्या वकीलाने तुमच्या विरुध्द जाहीर नोटीस काढण्यासंबंधी अर्ज दाखल केला आहे. त्या अर्जावर मे.कोर्टाने आपल्या विरुध जाहीर नोटीस काढण्यासंबंधी हुकुम केला आहे.

तुम्हास या जाहीर नोटीस व्दारे कळविण्यात येते की, तुम्ही दिनांक २७-०८- २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता सह दिवाणी न्यायाधीश व स्तर, उदगीर यांच्या न्यायालयात स्वतः अथवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे, अन्यथा तुमच्या विरुध्द या प्रकरणाची एकतर्फी सुनावणी करन निकाल देण्यात येईल.

आज दिनाक १९-०७-२०२४ माझ्या सही कोर्टाच्या शिक्यानिशी देण्यात आले.

आदेशावरुन,
क. लिपीक अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर, उदगीर.

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

मा.के.ए.पोवार, २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उदगीर यांचे न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ५५८/२०२४ निशाणी क्रमांक ०७

ज्याअर्थी नामे Rajkumar S/o. Jagannath Bhange हे R/o. Gandhi Nagar, Udgir Tq.Udgir Dist.Latur दिनांक १९/०६/२०२२ रोजी At. Gandhi Nagar, Udgir Tq.Udgir Dist.Latur येथे मयत झाले आहेत आणि अर्जदार
1) Gayabai W/o. Rajkumar Bhange, Age-45, Occu. Labour
2) Kajal D/o. Rajkumar Bhange, Age-24, Occu.-H.H.
3) Renuka D/o. Rajkumar Bhange, Age-08, Occu. Education
4) Prachi D/o. Rajkumar Bhange, Age-02, Occu. Nil
3 & 4 are minor U/g. Of mother Gayabai Bhange
5) Nilabai W/o. Jagnath Bhange, Age-65 Occu-Nil All R/o. Gandhi Nagar, Udgir Tq. Udgir Dist. Latur A/p. Mahatma Fule Nagar, Udgir Tq. Udgir Dist. Latur

यांनी खालील नमूद ५ व्यक्ती हे मयताचे वारसदार असून

| Sr.No. | Name of Legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1) | Gayabai W/o. Rajkumar Bhange | 45 | Wife |
| 2) | Kajal D/o. Rajkumar Bhange | 24 | Daughter |
| 3) | Renuka D/o. Rajkumar Bhange | 08 | Daughter |
| 4) | Prachi D/o. Rajkumar Bhange | 02 | Daughter |
| 5) | Nilabai W/o. Jagnath Bhange | 65 | Mother |

अर्जदार याने Rajkumar S/o. Jagannath Bhange या नावांचे त्यांना मयताचे वारस प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार आहे त्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे. त्या अर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी हया जाहिरनाम्याचे तारखे पासुन एक महिन्याच्या आत हया न्यायालयात हजार होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालयात अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचे हक्क शाबित दिसल्यास त्यांना सदरह SRajkumar S/o. Jagannath Bhange यानचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांकः २४/०७/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
प्रकरणाची पुढील नेमलेली तारीखः ०५/०९/२०२४

आदेशावरुन

(के.डी.सुर्यवंशी) (एम.एल.सुत्राळे)
कनिष्ठ लिपिक सहा.अधिक्षक,
२ रे सहदिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर सहदिवाणी न्यायलय क.स्तर, उदगीर


## उदगीर मनोरंजन

कल्पना 70MM A/C DOLBY
११:३०,२:३०,०५:३०,८:३०
दररोज ४ शो




## उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्र रुग्णालय, उदगीर

उदय कॉलनीच्या पाठीमागे, लॉयन्स नगर, नांदेड नाका, उदगीर-४१३५१७ जि.लातूर
फोन नं. ०२३८५-२५५२४५,२९५२४५ मो. ९७१०२५५२४५

| वेळ सकाळी ०९ ते ५ | सर्व प्रकारची नेत्र सुविधा उपलब्ध | रविवार ९ ते १ | @24 hrs X 365 |
|---|---|---|---|

| १,५५,००० मोतिबिंदू शस्त्रक्रिया | ४५०० नेत्रतपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया |
|---|---|

मराठवाडयात एक अद्यावत नेत्र रुग्णालय

भेट देणारे विषेतज्ञ डॉक्टर्स

| | | |
|---|---|---|
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. नविन कुमार राठोड (हैद्राबाद) (M.D.,V.R.F.) LVPEI | ३ रा रविवार |
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. विडेकर चेतन किशारे (नांदेड) (D.N.B.,V.R.F.) LVPEI | २ रा शनिवार |
| कॉर्नीया सर्जन | डॉ. ए.आर. नळगीरकर (औरंगाबाद) (M.S.) (Cornea) | २ रा शनिवार |
| नासुर तज्ञ | डॉ. सचिन चोले (M.S.) (Cornea) (बीड)<br>डॉ. व्यंकटेश पोलावार (DORL) (उस्मानाबाद) | २ रा रविवार<br>४ था रविवार |
| काचबिंदू व बालरोग तज्ञ चिकित्सा | डॉ. श्री/सौ. शितल उदय नाईक | ४ था रविवार |

!! अंधमुलांसाठी अरुणा अभय ओसवाल रिसोर्स सेंटर !!
अंधत्व मुक्त अभियानांतर्गत सहभाग नोंदवा

डॉ. सौ. अर्चना पवार (M.S.) फेको तज्ञ — डॉ.अंकिता लाहोटी (DOMS) — डॉ. दिपाली पाटील (MS)
डॉ. शितल पेद्देवाड (M.S.) — डॉ. अपुर्वा लखोटे (MS, Ayur)

डॉ. आर.एन.लखोटिया अध्यक्ष — व समस्त लॉयन्स परिवार, उदगीर — लॉ. प्रदिप बेद्रे सचिव

DEEPJYOTI EYE HOSPITAL UDGIR

दिपज्योती डोळयांचा दवाखाना

डॉ. ज्योती सोमवंशी

M.B.B.S., M.S. Ophthalm
Consultant in Catract, Glaucoma, & Pediatric Ophthalmologist

30 वर्षाचा अनुभव
डोळयांचे 60 हजार यशस्वी ऑपरेशन







उपलब्ध सुविधा

उदगीर शहरात प्रथमच आत्याधूनीक मशिन (Infinity) व्दारे शस्त्रक्रिया.भुल न देता डोळ्या वरील मोतीबींदूचे शस्त्रक्रिया. मल्टीफोकल लेन्स यामुळे दुर आणी जवळचे चष्मा न घालता दिसण्याची सोय (Spectacle Free).बीनाटाक्याची मोतीबींदूवर शस्त्रक्रिया.लहान मुलामध्ये मोतीबींदू वर उपचाराची सोय.काच बिंदूचे निदान, उपचार,शस्त्रक्रियाची सोय. डोळ्यावरील पडदा, नासूर उपचाराची सोय.कॉम्प्युटर व्दारे नेत्र तपासणी.

नाईक चौक,निडेबन रोड, उदगीर जि.लातूर
"WE CARE FOR YOUR EYES"



Caring Since 1980

कै. यशवंतराव बहुउद्देशिय मेडिकल रिसर्च सेंटर द्वारा संचलित

४१ वे वर्षापर्ण

यशवंत नेत्र रुग्णालय व फॅको सेंटर
(दृष्टी-एकमेव ध्येय)

डॉ. विश्वास य. सताळकर नेत्ररोग तज्ञ | डॉ. यशोधन वि. सताळकर बाल नेत्ररोग तज्ञ | डॉ. अनुजा य. सताळकर नेत्ररोग तज्ञ

यशवंत नेत्र रुग्णालय व फॅको सेंटर
नंदादीप, नगर परिषदेच्या मागील बाजूस, नई अबादी, उदगीर फोन : 02385-256215



# दयानंद वाणिज्य महाविद्यालयात कारगिल विजय दिवस विविध उपक्रमांनी साजरा

लातूर, ता.२७: येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद वाणिज्य महाविद्यालयात कारगिल विजय दिवसाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करून कारगिल दिवस साजरा करण्यात आला. प्रारंभी कारगिल युद्धात शहीद झालेल्या वीर जवानांना दोन मिनिटांचे मौन धारण करून अभिवादन करण्यात आले.

कारगिल युद्धातील वीरांच्या सन्मानार्थ दरवर्षी २६ जुलै रोजी कारगिल विजय दिवस साजरा केला जातो. ५३ महाराष्ट्र बटालियन एन. सी .सी. लातूर चे कमांडिंग ऑफिसर कर्नल हेमंत जोशी, ए.ओ. लेफ्टनंट कर्नल वाय. बी.सिंह यांच्या सूचनेनुसार व प्रभारी प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ.मनीषा आष्टेकर, असोसिएट एन.सी.सी ऑफिसर लेफ्टनंट डॉ. साईनाथ उमाटे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक डॉ. बालाजी कळंबे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी सर्व कॅडेट व विद्यार्थांना शेरशाह ही फिल्म दाखऊन त्यांच्या मनात राष्ट्र प्रेमाची भावना जागृत करण्यात आली.

# श्री देशिकेंद्रच्या विद्यार्थ्यांनी लघुनाटिका व कवितेतून दिले पर्यावरण रक्षणाचे धडे



लातूर: येथील श्री देशिकेंद्र विद्यालयातील विद्यार्थ्यांनी पर्यावरणाच्या सद्यस्थितीवर टोकदार भाष्य करणाऱ्या लघुनाटिका व पर्यावरणीय समस्यांचा वेध घेणाऱ्या झाडावरच्या कविता बहारदारपणे साभिनय सादर केल्या व उपस्थित विद्यार्थ्यांना पर्यावरण रक्षणाचे धडे दिले.

शिक्षण सप्ताहानिमित्त शनिवारी मिशन लाईफच्या दृष्टीकोनातून इको क्लब उपक्रम विद्यालयात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.या निमित्ताने पर्यावरण जागृती चे अभियान नियमित राबविण्यासाठी विद्यालयात तुकडीनिहाय इको क्लब स्थापना करण्यात आले तसेच पर्यावरण रक्षणासंबंधी विविध उपक्रम घेण्यात आले. विद्यार्थ्यांनी चित्रयुक्त संदेश, यमकयुक्त घोषणांची तक्ते यातूनही पर्यावरणाबाबत माहिती सादर केली.विद्यार्थी-विद्यार्थीनींनी वर्गावर्गात लघुनाटिका,कविता सादर केल्या,

दहावी वर्गातील श्रुती राजे हिने 'चला,झाडे लावू या'ही स्वलिखित अडीच मिनिटांची लघुनाटिका आदिती मुरुमकर व आदिती आळंगे या विद्यार्थ्यांनीसह सादर केली. विद्यालयातील बालकविंनी 'झाडावरच्या कविता' सादर करून आपल्या प्रतिभेची चुणूक दाखवली.त्यात दहावीतील वैभवी स्वामी हिने 'झाड हे एक झाड असतं,; पानाफुलांनी गजबजलेलं एक गाव असतं' या काव्यपंक्ती सादर करुन झाडाचे महत्त्व विशद केले तर नववीच्या प्रणव वंजे याने 'झाड देत नसते फक्त सावली ;असते तुमची आमची सर्वांची माऊली' या शब्दात झाड आणि मानव यांचे नातं उलगडून दाखवलं तर स्वरा शिंदे ने 'फळे देते फुले देते, देते गार गार सावली; झाड मला आवडते, जशी माझी माऊली' या काव्य पक्तीतून झाडाचा दिलदारपणा सादर केला. विद्यालयाचे मुख्याध्यापक रुपसिंग सगर, उपमुख्याध्यापकशिवानंदस्वामी, पर्यवेक्षक पुष्पा पाटील, वर्षा सांडे,मनोज दानाई यांच्या हस्ते वृक्षारोपण ही करण्यात आले.या दिनानिमित्ताने विद्यार्थ्यी-विद्यार्थीनी पर्यावरणाबाबत सजग व जागरुक असल्याचे दिसून आले.हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक -शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परीश्रम घेतले.

# मुरुडमधील बसस्थानकात आता सिमेंट रस्ता

## आ. धिरज देशमुख यांच्या हस्ते काँक्रिटीकरण कामाचा शुभारंभ




लातूर / प्रतिनिधी- महाविकास आघाडी सरकारच्या काळात मंजूर झालेल्या निधीतून लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघामधील मुरुड येथे नवे बसस्थानक उभे राहत असून याचे काम अंतिम टप्यात आहे. या बसस्थानक परिसरातील वाहनतळाच्या व रस्त्याच्या सिमेंट काँक्रीटीकरण (२ कोटी) कामाचा शुभारंभ लातूर ग्रामीण मतदारसंघाचे आमदार श्री. धिरज विलासरावजी देशमुख यांच्या हस्ते करण्यात आला.

मुरुड ग्रामस्थांची मागणी व विद्यार्थी प्रवाशांची सोय लक्षात घेऊन बसस्थानक वाहनतळाचे काँक्रीटीकरण करण्यासाठी शासनाकडे वेळोवळी पाठपुरावा केला. त्यातून दोन कोटी रुपयांच्या कामाला शासनाने मान्यता दिली. या निधीतून बसस्थानक परिसरातील वाहनतळाचे व रस्त्याचे काम आजपासून सुरू झाले आहे. याचा शुभारंभ करून आमदार श्री. धिरज विलासरावजी देशमुख यांनी ग्रामस्थांशी व एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांशी संवाद साधला.

पाणी बसस्थानकात येवू नये, यासाठी मुख्य रस्त्याच्या उंचीचा विचार करून बस स्थानकातील रस्ता बांधावा, याचे काम वेळेत व दर्जेदार पद्धतीने करावे. हे बसस्थानक वर्दळीचे ठिकाण असल्याने प्रवाशांना त्रास होणार नाही, प्रवाशांना चिखलात उभे राहू लागू नये याबाबत योग्य ते वाहतूक करावे अशा सूचना आमदार श्री. धिरज विलासरावजी देशमुख यांनी दिल्या.

यावेळी दिलीपदादा नाडे, बी. एन. डोंगरे, विजय देशमुख, रविंद्र काळे, सुभाष घोडके, उद्धव सवासे, परिवहन महामंडळचे अभियंता अभिजित भोसले, अभयसिंह नाडे, आकाश कणसे, ईश्र्वर चांडक, मुरुड बसस्थानकाचे वाहतूक नियंत्रक बाळासाहेब देवकर, दिनेश नवगिरे, दीपक पठाडे आदीसह काँग्रेस व महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# काजळा येथे श्री सद्गुरू रामानंद महाराज ग्रंथ प्रकाशनचे आयोजन

धाराशिव दि.२७ (प्रतिनिधी) - तालुक्यातील काजळा येथे श्री सद्गुरू ब्रम्हचारी रामानंद महाराज यांच्या जीवन चरित्रावरील ग्रंथाचे प्रकाशन दि.४ ऑगस्ट रोजी करण्यात येणार आहे.

धाराशिव तालुक्यातील काजळा येथील रामानंद महाराज मठामध्ये पंढरपूर येथील श्री विठ्ठल - रुक्मिणी मंदीर समितीचे सहअध्यक्ष, किर्तनकार हभप गहीनीनाथ महाराज औसेकर यांच्या शुभहस्ते प्रकाशन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी तथा श्री तुळजाभवानी मंदीर संस्थानचे अध्यक्ष डॉ. सचिन ओंबासे यांची उपस्थिती राहणार आहे. हा ग्रंथ धाराशिव तालुक्यातील राजुरी येथील प्रगतशील शेतकरी व श्री रामानंद महाराजांचे भक्त हरीदास उर्फ नाना वाघमोडे यांनी लिहीला आहे. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून कीर्तनकार हभप नवनाथ महाराज चिखलीकर, जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष धनंजय रणदिवे, श्री रामानंद महाराज देवस्थान समितीचे अध्यक्ष प्रदीप शेळके यांची उपस्थिती लाभणार आहे. लेखक वाघमोडे म्हणाले की, सद्गुरू श्री रामानंद महाराज हे काही वर्षे राजुरी येथील आमच्या शेतामध्ये वास्तव्यास होते. महाराजांची आमचे कुटुंबिय व शेतातील सालगडी सेवा करीत असत. या दरम्यान आमच्या गड्याला महाराजांच्या जीवनातील काही अद्भूत व चमत्कारीक प्रसंग साक्षात पहावयास मिळाले. त्या शेतमजुराने सांगितलेल्या सत्य घटना मी एका वहीमध्ये लिहुन ठेवल्या. आज ६० वर्षानंतर त्या सर्व कहाणी एकत्र करून त्याचे ग्रंथामध्ये रुपांतर करण्यात आले आहे. या ग्रंथाचे प्रकाशन करून रामानंद महाराजांच्या भक्तांसाठी हा ग्रंथ उपलब्ध करून देण्यात खूप आनंद होत असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमास धाराशिव, चिखली, काजळा, राजुरी, सारोळा, वाणेवाडी, दारफळ व वाघोली आदी गावातील ग्रामस्थ व भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन त्यांनी केले आहे.

# उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त चाकुरात विविध कार्यक्रम



चाकूर / प्रतिनिधी- शिवसेनाप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त चाकूर तालुका शिवसेना व युवासेनेच्या वतीने तालुक्यात विविध सामाजिक कार्यक्रम घेऊन वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक सप्ताह विविध कार्यक्रमांनी साजरा करण्याचा संकल्प करण्यात आला असून शनिवारी तालुका प्रमुख नंदकुमार पवार यांच्या नेतृत्वाखाली माजी उपजिल्हाप्रमुख अंगद पवार यांच्या पुढाकारातून अपंग शाळेतील दिव्यांग विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करून ग्रामीण रुग्णालयातील रुग्णांना फळे वाटप करण्यात आले. यावेळी युवासेनेचे लक्ष्मण पेटकर,गुंडेराम शिंदे,दत्ता कलाले,नागेश कोंबडे,राजेंद्र शेवाळे,बालाजी गौडगावे,शिवकुमार गायकवाड, श्रीराम गायकवाड,माधव सुगावकर, सूर्यभान कोंपले, नीलकंठ बिडवे, धोंडीराम वाघमारे गणपत सिंदाळकर, पांडुरंग वाघमारे, राम पाटील,गणेश पांचाळ, तेजस कांबळे,विशाल जाधव, प्रवीण सूर्यवंशी,सुशांत गुळवे बालाजी केंद्रे आदिसह चाकूर तालुक्यातील शिवसैनिक मोठया संख्येने उपस्थित होते.

# न्यायालयातून पळालेला आरोपी २४ तासांच्या आत गजाआड

धाराशिव दि.२७ (प्रतिनिधी) - न्यायालयातून पळून गेलेल्या आरोपीस तासांच्या आत केले आहे. ही कामगिरी स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी केली.

पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक गौहर हसन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक वासुदेव मोरे, सपोनि अमोल मोरे, सचिन खटके, पोलीस हवालदार हुसेन सय्यद, जानराव, पोलीस नाईक जाधवर पोलीस अंमलदार रवींद्र आरसेवाड, चालक पोलीस हवालदार चौरे हे जिल्ह्यातील माला विषयक गुन्ह्यातील आरोपीचा शोध घेवून माला विषयक गुन्हे उघड व पाहिजे फरारी आरोपीचा शोध घेण्यासाठी पेट्रोलींगसाठी रवाना होवून वडगाव (सि) येथे आले होते. या पथकास आनंद नगर पोलीस ठाण्यात गुरन २१९/२०२४ कलम २६२ बीएनएस या गुन्ह्यामधील आरोपी उत्तमी कायापूर येथील अजित धनाजी बोंदर (वय २६ वर्षे) हा त्याच्या शेतात असल्याची गोपनीय बातमी मिळाल्याने पथकाने लागलीच त्या ठिकाणी जावून त्या आरोपीस ताब्यात घेवून पुढील कार्यवाहीसाठी आनंदनगर पोलीसांच्या ताब्यात दिले.

# लष्कराने घुसखोरीचा कट उधळला एक घुसखोर ठार एक जवान शहीद

जम्मू : जम्मू-काश्मीरच्या कुपवाडा सुरक्षा दलाने घुसखोरीचा प्रयत्न हाणून पाडला आहे. यावेळी एलओसीवर भारतीय लष्कर आणि पाकिस्तानी बॉर्डर ॲक्शन टीममध्ये गोळीबार झाला. यात एक घुसखोर मारला गेला आहे. तर लष्कराचा एक जवान शहीद झाला असून एक जवान जखमी झाल्याचे सांगण्यात येत आहे. कुपवाडातील माछिल भागात लष्कराने घुसखोरीचा प्रयत्न हाणून पाडला आहे, अशी माहिती देताना भारतीय लष्कराच्या चिनार कॉर्प्सने सांगितले की, नियंत्रण रेषेवरील माछिल सेक्टरमधील एका चौकीवर अज्ञात लोकांनी गोळीबार केला.

संरक्षण विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार, भारतीय लष्कराने घुसखोरीचा प्रयत्न हाणून पाडला आहे. यावेळी पाकिस्तानी बोर्ड ॲक्शन टीमने एलओसीवर भारतीय लष्कराच्या जवानांवर हल्ला केला.

## सुवर्णपदक विजेत्या कुस्तीपटूवर शेळ्या राखण्याची वेळ

सोलापूर,- ग्रामीण भागातील अनेक जण विविध क्रीडा प्रकारात राज्याचे, देशाचे नाव मोठे करतात. विविध क्रीडा पदके जिंकत देशाला सन्मान मिळवून देतात. मात्र, नंतरच्या काळात त्यांना कुठलीही शासकीय मदत मिळत नाही. अशामुळे अशा खेळाडूंना अत्यंत हालाखीचे जीवन जगावे लागते. देशपातळीवर कुस्तीचे मैदान मारून सुवर्णपदक मिळवलेल्या मोहोळ तालुक्यातील हराळवाडी येथील कुस्तीपटूवर आज शेळ्या राखून संसाराचा गाडा चालविण्याची वेळ आली आहे. देशपातळीवर गावाचे आणि जिल्ह्याचे नाव गजविणारा हा कुस्तीपटू हलाखीचे जीवन जगत आहेत.

मोहोळ तालुक्यातील हराळवाडी येथील कुस्तीपटू वाल्मिक माने यांनी १९७९ साली शिमला येथे झालेल्या रेसलिंग फ ेडरेशन ऑफ इंडियाच्या कुस्ती स्पर्धेत देशपातळीवर चौथा क्रमांक पटकावला होता. तर महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेच्या स्पर्धेत राज्य पातळीवर सुवर्णपदक पटकावले होते. पण काळाच्या ओघात माने यांच्यावर हालाखीचे जीवन जगत आहेत. त्यांच्यावर आता गावाकडे शेळ्या राखून घर चालवण्याची वेळ त्यांच्या आली आहे.

वाल्मिक माने यांनी गावातील एका टेलरकडून लंगोटा शिवून घेतला आणि गावच्या तालमीत कुस्तीसाठी पहिले पाऊल ठेवले. त्यानंतर गावोगावी यात्रांमध्ये कुस्तीच्या स्पर्धा जिंकल्या. पुढे सोलापूरच्या पत्रातालमीत मेहनत करून अनेक मैदाने मारली. राज्य आणि देशपातळीवर अनेक कुस्ती स्पर्धा खेळल्या व अनेक पदके मिळवली.

पान १ वरून

## महाराष्ट्रासारख्या....

तरतूद यावर्षीच्याच अर्थसंकल्पात केली आहे. त्यामुळे या योजनेसाठी पैसा कुठून आणणार?, हा प्रश्नच उद्धवत नाही. महाराष्ट्रासारख्या आर्थिक संपन्न राज्याला एवढी रक्कम खर्च करणे शक्य आहे.

महाराष्ट्राचा उपमुख्यमंत्री आणि राज्याचा अर्थ व नियोजन मंत्री म्हणून मी स्वत:च 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजना राज्याच्या वर्ष २०२४-२५ च्या अतिरिक्त अर्थसंकल्पात सादर केली आहे. वित्त व नियोजन, सर्व संबंधित विभाग तसेच राज्य मंत्रिमंडळाच्या मान्यतेनंतरच या योजनेची घोषणा मी राज्याच्या अर्थसंकल्पात केली.

राज्यातील माता-भगिनी-मुलींच्या आर्थिक स्वातंत्र्य, स्वावलंबन, पोषण व सर्वांगीण सक्षमीकरणासाठी, मान, सन्मान, स्वाभिमान वाढवण्यासाठी ही रक्कम खर्च करण्याची राज्य शासनाची तयारी आहे. त्यामुळे 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'ला या राज्यातील कुणाचाही विरोध असण्याचे कारण नाही, असूच शकत नाही. काही प्रसार माध्यमांमध्ये प्रसिद्ध झालेल्या, या योजनेला वित्त विभागाचा विरोध असल्याच्या बातम्या कपोलकल्पित, वस्तुस्थितीशी, विसंगत, राजकीय हेतूने प्रेरित आहेत. प्रसार माध्यमांनी अशा बिनबुडाच्या बातम्या देणे कृपया थांबवावे.

राज्यातील कुणाचाही अशा बातम्यांवर विश्र्वास बसणार नाही, याची मला खात्री आहे. 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेच्या यशस्वितेसाठी अधिकाधिक भगिनींना यात सहभागी करून घेण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करूया, या आशयाचे ट्वीट अजित पवार यांनी केले आहे.

## राहुल गांधींना...

मिळालेल्या माहितीनुसार, ५-सुनहरी बाग रोड इथला हा बंगला 'टाइप ८' श्रेणीतला आहे. साधारणपणे कॅबिनेट मंत्र्यांना हे निवासस्थान दिलं जातं. लोकसभेतल्या विरोधी पक्षनेत्याला केंद्रीय मंत्र्यासारखा दर्जा असतो. त्यामुळे राहुल यांना त्यांचं सध्याचं पद आणि रँकिंगनुसार त्यांना या निवासस्थानाची ऑफर देण्यात आली आहे.

राहुल अनेक वर्ष '१२ तुघलक लेन' या पत्त्यावर राहत होते; पण गेल्या वर्षी मानहानीच्या खटल्यात गुजरातम धल्या कनिष्ठ न्यायालयाने त्यांना दोषी ठरवल्यानंतर त्यांचं सदस्यत्व गेलं. त्यामुळे त्यांनी स्वत: हे घर सोडलं होतं. तेव्हापासून ते त्यांची आई आणि काँग्रेस संसदीय पक्षाच्या प्रमुख सोनिया गांधी यांच्या घरी राहत होते. सोनिया '१० जनपथ' इथे राहतात.

काँग्रेसचे माजी अध्यक्ष असलेल्या राहुल यांनी या लोकसभा निवडणुकीत उत्तर प्रदेशातल्या रायबरेली आणि केरळमधल्या वायनाडमधून उमेदवारी अर्ज भरला होता. विशेष म्हणजे ते दोन्ही ठिकाणी निवडून आले. त्यांनी रायबरेलीची निवड करून वायनाडम धली जागा रिक्त केली आहे. इंडिया आघाडीने राहुल यांच्याकडे विरोधी पक्षनेतेपदाची जबाबदारी दिली आहे. दोन वर्षापासून राहुल यांनी भाजप आणि केंद्र सरकारविरोधात जोरदार आघाडी उघडली आहे. ते सातत्याने सरकार आणि सरकारच्या धोरणांवर जोरदार टीका करत आहेत. त्यांच्या आक्रमक धोरणाचा या निवडणुकीत काँग्रेसला फायदाही झाल्याचं दिसत आहे.

## वीरशैव...

अंकुश काळे, शिक्षक संघटनेचे अध्यक्ष शिवानंद भरले, प्रा. नसीमा पठाण, साहित्यिका शांता मरगूर, शोभा बोल्ली, चेतना गौरशेटे (बीड) आदी उपस्थित होते. रूपाली स्वामी, प्रमोदिनी स्वामी, स्नेहलता सर्जे, श्रीदेवी बिराजदार, काशिनाथ आकाशे, महेश कोटीवाले, राहुल बिराजदार, संतोष मनगोंडे यांनी पुरस्कारप्राप्त मान्यवरांचा परिचय करून दिला.

यावेळी मन्मथप्पा पंचाक्षरी, सुदर्शन बिराजदार, गुलाब पाटील, बाबुअप्पा सोलापूरे, बसवंत भरडे, शिवराजअप्पा शेटकर, ॲड. सलगरे, ॲड. कल्पना भुरे, कमलेश पाटणकर, लक्ष्मीकांत सोनी, डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे, इंजि. उषा मोतीपवळे, ॲड. सुमित झुंझुरे, प्रा.व्यंकटराव पाटील, इ. उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गुरूशांत रामपुरे, सिद्धू हिरेमठ, महेश मैंदर्गीकर, सुनील सर्जे यांनी परिश्रम घेतले.

**यांना मिळाले पुरस्कार**

डॉ. चंद्रशेखर कपाळे साहित्य पुरस्कार डॉ. वेदप्रकाश डोणगावकर-मठवाले (वाशिम), वे. मू. वीरसंगय्या स्वामी आदर्श शिक्षक पुरस्कार राजेंद्र बलसुरे (सोलापूर), वे. मू. सदाशिव स्वामी प्रज्ञा पुरस्कार ऐश्र्वर्या कुलकर्णी (धाराशिव), वे.मू. बंडय्या मठपती समाजसेवा पुरस्कार महेश स्वामी (पिंपरी चिंचवड, पुणे), विठाबाई देवाप्पा पसारकर कृतज्ञता पुरस्कार व्याख्यान केसरी वे. मू. बसवराज शास्त्री-हिरेमठ (सोलापूर), श्री ष. ब्र. परंडकर महाराज पत्रकारिता पुरस्कार प्रा. भीमाशंकर मोतीपवळे चाकूरकर (लातूर), सिद्रामप्पा भोगडे नाट्यकर्मी पुरस्कार गुरुनाथ वठारे (सोलापूर), शांताबाई व निवृत्ती गायकवाड (स्वकुळ साळी समाज) कीर्तनकार पुरस्कार ह. भ. प. डॉ. अनंत भाऊराव बिडवे (बार्शी).

## विजय मल्ल्याच्या...

केल्याचं सेबीच्या चौकशीत आढळलं होतं. जानेवारी २००६ ते डिसेंबर २००८ या कालावधीत मल्ल्यानं फसवणुकीच्या व्यवहारातून ५७ लाख डॉलर्सची कमाई केल्याचे सेबीच्या तपासात दिसून आले.

सेबीच्या नियमांनुसार, एफआयआयद्वारे केवळ भारताबाहेर राहणारेच भारतीय बाजारपेठेत गुंतवणूक करू शकतात. विजय मल्ल्याने हा नियम मोडला आहे.

९ हजार कोटींची थकबाकी

किंगफिशर बिअर उत्पादक युनायटेड ब्रेवरीजमध्ये विजय मल्ल्याचा ८.१ टक्के हिस्सा आहे. स्मिरनॉफ व्होडका उत्पादक युनायटेड स्पिरिट्समध्येही त्याचा ०.०१ टक्के हिस्सा आहे. विजय मल्ल्यावर बँकांचे नऊ हजार कोटी रुपयांहून अधिक कर्ज आहे. मार्च २०१६ मध्ये त्याने देश सोडला. तो सध्या ब्रिटनमध्ये आहे. १८० कोटी रुपयांचे कर्ज बुडवल्याप्रकरणी सीबीआयच्या विशेष न्यायालयाने विजय मल्ल्याविरोधात १ जुलै रोजी अजामीनपात्र वॉरंट जारी केले होते.

## श्री क्षेत्र निळकंठेश्वर...

की, मंदिर परिसरात होणारी विकास कामे दर्जेदार व्हावीत, पिढ्यान पिढ्या टिकणारी कामे झाली पाहिजे अशी सूचना केली.

लातुर तालुक्यातील मौजे निळकंठ येथील श्री निळकंठेश्वर देवस्थान येथे स्वयंभू शिव व शक्ती अशा दोन पिंड विराजमान आहेत. हे खूप दुर्मिळ आहे. या देवस्थानास सातत्याने असंख्य भाविकभक्त श्रद्धेने येत असतात. भाविकांची वाढती संख्या लक्षात घेवून येणाऱ्या भाविकांना सोयी सुविधा मिळाव्यात मंदिर परिसराचा विकास व्हावा यासाठी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी राज्य शासनाकडे पाठपुरावा करून ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत श्रीक्षेत्र निळकंठेश्वर देवस्थानाला ङ्गबफ दर्जा मिळवून दिला. सदरील ब दर्जा प्राप्त झाल्याने मोठ्या प्रमाणात निधीची तरतूद होऊन भाविकांसाठी विविध सोयी सुविधा बरोबरच या मंदिर परिसरचा सर्वांगीण विकास होणार आहे. देवस्थानास ङ्गबफ दर्जा मिळून दिल्याबद्दल आ रमेशआप्पा कराड साहेब यांचे श्री निळकंठेश्वर देवस्थानचे पदाधिकारी आणि त्या परिसरातील विविध गावातील भाविक भक्त आणि नागरिकांच्या वतीने यथोचित सत्कार करून आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले

यावेळी भाजपाचे तालुकाध्यक्ष बन्सी भिसे, श्रीनिळकंठेश्वर देवस्थानचे अध्यक्ष शिवदत्त औताडे, भुजंग औताडे, गणेश पुरी, किरण शिंदे, शालीक औताडे, शिवाजी आंबेकर, चेअरमन चंद्रकांत वागस्कर, प्रभू औताडे, श्यामसुंदर वाघमारे, भैरवनाथ पिसाळ, बापूराव बिडवे, अशोक सावंत, कमलाकर भुसारे, महेश आताडे, अच्युत पिसाळ, हनुमंत औताडे, मधुकर बिडवे, रामभाऊ पिसाळ, सुभाष पिसाळ, तानाजी ढोबळे, महादेव बिडवे, बापुराव बिडवे, मेघराज पिसाळ, विजय पिसाळ, युवराज औताडे, अच्युत पिसाळ, सुखदेव कुकर, रामेश्वर पाटील, वामन बिडवे, मधुकर बिडवे, मुन्ना पिसाळ, अभिषेक बिडवे, अर्जुन वाघमारे, रामभाऊ पिसाळ, औदुंबर पवार, यांच्यासह पिंपळगाव आंबा, निळकंठ, भोसा, मसला, तांदूळजा या विविध गावातील नागरिक, भाविक भक्त आणि भाजपाचे लोकप्रतिनिधी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आ. अमित....

अपर्जित मरगणे, धनाजी चांदोरे, बब्रुवान जाधव, पत्रकार हरून मोमीन, आरिफ मोमीन, लातूर जिल्हा महिला काँग्रेसच्या अध्यक्षा शीलाताई पाटील, आशिष पाटील, धाराशिव शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अग्निवेश शिंदे, प्रशांत पाटील, हिंगोली जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष दिलीपराव देसाई, संदीप देसाई, नांदेड जिल्हा काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष विठ्ठल पावडे, गणेश कोकाटे, मुकेश पटणे, सतीश पाटील वडगावकर, माजी नगराध्यक्षा उषाताई कांबळे, डॉ. गोविंद सोनकांबळे, गोविंद घार, इम्रान सय्यद, संजय निलेगावकर, माजी उपनगराध्यक्ष मोहन माने, राजा माने, कमलाकर शिंदे, धैर्यशील भोसले, चंद्रकांत मद्दे, सीराजुद्दीन जहागीरदार, विकास महाजन, अनिल चव्हाण, संतोष पाटील, प्रकाश क्षीरसागर, धाराशिव जिल्हा युवक काँग्रेसचे अध्यक्ष आश्लेष मोरे, विशाल काणेकर, विजय वाघमारे, अजय कांबळे, महेश जाधव, गणेश देशमुख, डॉ. कल्याण बरमदे, डॉ. अशोक पोद्दार, डॉ.स्वाती गोरे, जळकोट तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मारुती पांडे, डॉ.जाकेर केळगावकर, सचिन बंडापले, पुनीत पाटील, युनूस मोमीन, अकबर माडजे, डॉ.प्रसाद उदगीरकर, डॉ.लक्ष्मीकांत कर्वा, ज्योतीताई पवार, संजय पवार, हरिभाऊ गायकवाड, मुकुलभाई वलांडीकर आदिसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी,कार्यकर्ते,नागरिक उपस्थित होते.

**लोकमान्य अर्बन क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि. उदगीर नगरपरिषद, उदगीर जि. लातूर संस्थेच्या विविध ठेवी योजना**

| कालावधी | व्याजदर |
|---|---|
| ३० ते ४५ दिवस- | ५.५०% |
| ४६ ते १८० दिवस | ७.५०% |
| १८१ ते ३६५ दिवस | ८.५०% |
| १२ महिने ते २४ महिने | ९.७५ % |
| २४ महिने ते ३६ महिने | १०.५०% |
| ३६ महिने ते ६० महिने | ११% |
| लोकमान्य मासीक व्याज प्राप्ती ठेव योजना | १०% |

**९% आवर्त ठेव द.सा.द.शे,** ०.५०% अधिक व्याजदर जेष्ठ नागरीक व महिला, दाम दुप्पट, ७८ महिने, वैयक्तिक कर्ज व इतर कर्ज १६%, सोने तारण कर्ज १४%, वेअर हाऊस कर्ज १६%, वरिल सर्व ठेवीवर नियम व अटी लागु.




# भारताच्या महामहिम राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मु यांचा उदगीर येथील कार्यक्रम लांबणीवर

**उदगीर (प्रतिनिधी)** उदगीर शहरात उभारण्यात आलेल्या बुद्ध विहाराचा लोकार्पण सोहळा भव्यदिव्य करण्यासाठी युद्धपातळीवर काम चालु होते कारण भारताच्या महामहिम राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मु यांच्या हस्ते मंगळवार, दि. ३० जुलै, २०२४ रोजी उदगीर येथील बुद्ध विहाराचे उद्घाटन होणार होते.

मात्र महामहिम राष्ट्रपती यांचा पूर्वनियोजित महाराष्ट्र दौरा हा कोल्हापूर व पुणे येथील पुरसदृश्य परिस्थिती आणि मुंबई येथील मुसळधार पाऊस असल्याकारणाने पुढे ढकलण्यात आल्याचे राष्ट्रपती भवन, नवी दिल्ली येथून कळविण्यात आले आहे. मात्र लवकरच महामहिम राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांच्या दौराची पुढील तारीख कळवण्यात येणार असुन त्यानुसार उदगीरच्या बुध्द विहाराचा कार्यक्रम मोठ्या थाटा - माटात होणार असल्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी सांगितले.



**दैनिक यशवंत विभागीय कार्यालय उदगीर येथे विभागीय जिल्हा माहिती सहाय्यक श्याम टरके व जिल्हा माहिती अधिकारी तानाजी घोलप यांनी सदिच्छा भेट दिली. राम मोतीपवळे यांच्या हस्ते 'तुझा विसर न व्हावा' ग्रंथभेट देवून स्वागत करण्यात आले. यावेळी प्रा. प्रविण जाहुरे, राजकुमार मोगले, सुर्यकांत मादळे इत्यादी उपस्थित होते.**

# नगर परिषदेचे कर्मचारी म्हणजे शहराची लाईफ लाईन : ना. संजय बनसोडे

## * सफाई कर्मचारीच खरे देवदूत *



**उदगीर (प्रतिनिधी)** उदगीर शहराला स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी वेगवेगळ्या शिफ्टमध्ये नगर परिषदेचे कर्मचारी काम करत असतात खऱ्या अर्थाने त्यांच्या कष्टांमुळेच उदगीर शहर स्वच्छ असते म्हणूनच आपण सफ्फाई कर्मचाऱ्यांना आपल्या शहराची लाईफ्फ लाईन समजतो आपले सफ्फाई कर्मचारीच खरे देवदूत असल्याचे मत राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी व्यक्त केले.

ते शहरातील अग्निशामक दलाच्या फ्फायर बुलेटचा लोकार्पण सोहळा व नगर परिषदेच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना रेनकोट व महिलांना साडी वाटप कार्यक्रमाप्रसंगी बोलत होते.

यावेळी राष्ट्रवादी प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस व्यंकटराव बेद्रे, माजी पाणीपुरवठा सभापती अनिल मुदाळे, इब्राहिम देवर्जनकर, एस.एस. कटके , फय्याज शेख, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे उदगीरचे शहराध्यक्ष गिरीश उप्परबावडे, राजकुमार चव्हाण, अग्निशामक विभाग प्रमुख विशाल अल्टे, उमाकांत गंडारे, सचिन स्वामी, सतिश कांबळे, सुरेश उप्परबावडे, नाशिर सय्यद, विनोद रंगवाळ, सुमनबाई सुतार, अमित सुतार आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना नामदार संजय बनसोडे यांनी, भर पावसात आपले कर्मचारी वेगवेगळ्या शिफ्ट मध्ये १२ - १२ तास काम करत असतात पावसापासून त्यांचे संरक्षण व्हावे म्हणून माजी नगरसेवक अनिल मुदाळे यांच्या पुढाकाराने २५० कर्मचाऱ्यांना रेनकोट तर महिला कर्मचाऱ्यांना साडीचे वाटप आज आपण करत आहोत. मात्र पुढील काळात कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या न्याय हक्कासाठी आपण स्वतः लक्ष देऊन मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्याकडे कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या प्रश्नाकडे लक्ष वेधून त्यांच्यासाठी विशेष बाब म्हणून निधीची मागणी करणार असल्याचे ना. बनसोडे यांनी सांगितले.

उदगीर शहराची वाटचाल ही जिल्ह्याच्या दिशेने असून भविष्यात उदगीर जिल्हा होणार या दृष्टीनेच आपण शहरातील पायाभूत सुविधा उपलब्ध करत आहोत मागील काळात हजारो कोटींचा निधी उपलब्ध करुन देवुन उदगीर मतदारसंघाचा कायापालट केला उदगीर नगर परिषदेच्या वतीने हद्द वाढीचा प्रस्ताव प्रलंबित होता तो ही मागील काळात आपण स्वतः लक्ष देऊन नगरपालिकेची हद्द वाढवली. मागील पाच वर्ष मी आपला जनसेवक म्हणून कार्य केले आहे. त्यामुळेच आपले उदगीर बदलेल दिसतय. भविष्यकाळात आपण सर्वजण विकासाच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहाल अशी आशा ना. बनसोडे यांनी व्यक्त केली.

शहरात एखाद्या ठिकाणी आग लागली तर आपल्याकडे अग्निशामक दलाचे वाहन आहे मात्र ज्या ठिकाणी मोठे वाहन पोहोचू शकत नाही त्या ठिकाणी आपली फायर बुलेट जाऊन अगदी गल्लीबोळातली सुद्धा आग आटोक्यात आणण्याचे काम आपले हे अग्निशामक दलाचे जवान करतील असा विश्वास व्यक्त केला.

यावेळी नगर परिषदेचे कंत्राटी कर्मचारी अग्निशामक दलाचे जवान व विविध विभागातील प्रमुख व स्वच्छता निरीक्षक उपस्थित होते.

# श्री हावगीस्वामी महाविद्यालयात विद्यार्थ्यांना एस.टी. बसपासचे मोफत वाटप



**उदगीर (प्रतिनिधी)** येथील श्री हावगीस्वामी महाविद्यालयामध्ये अकरावी व बारावीच्या विद्यार्थिनींना मोफ्फत एस.टी.बसपासचे वाटप करण्यात आले.

एस.टी महामंडळाच्या पुण्यश्लोक आहिल्याबाई होळकर योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील विद्यार्थीनींना महाविद्यालयीन शिक्षणासाठी ये-जा करण्यासाठी मोफ्फत एसटी पास मिळतो. दि. २६ जुलै रोजी महाविद्यालयात पासचे वाटप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन.जी. एमेकर, उपप्राचार्य डॉ. ए.ए.काळगापुरे, महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा.अजित रंगदळ, पर्यवेक्षक प्रा. महेश बोळेगावे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमासाठी माजी पर्यवेक्षक प्रा. एम. एम. भंडारे,प्रा.एन.आर.हाके, डॉ.एस.आर.अनकल्ले ,कार्यालयीन अधिक्षक श्री धनुरे सर, श्री दुधे सर यांनी पुढाकार घेतला.

यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक ,विद्यार्थी-विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उपविभागीय कृषी अधिकारी काळे व जिल्हा कृषी अधिक्षक जाधव यांची जळकोट तालुक्यातील विविध प्रक्षेत्रांना भेट



**जळकोट (माधव होनराव)** तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये नविन तंत्रज्ञान वापरून शेती केली जात असून कृषी विभागाच्या मार्गदर्शनामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांचा फ्फळबाग विकसित करण्याकडे कल वाढत आहे. तालुक्यातील शेतकऱ्यांच्या विविध प्रक्षेत्रांना भेटी देऊन लातूरचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आर टी जाधव, उपविभागीय कृषी अधिकारी आर एन काळे यांनी समाधान व्यक्त केले.

जळकोट तालुक्यातील घोणसी येथील प्रगतिशील शेतकरी अनिल नारायण जानतिने यांच्या राज्य पुरस्कृत मूल्य साखळी प्रकल्प अंतर्गत बी बी एफ्फ तंत्रज्ञानाद्वारे पेरणी करण्यात आलेल्या २५ एकर सोयाबीन प्रक्षेत्राची पाहणी करून मार्गदर्शन केले. एम आर इ जी एस अंतर्गत फ्फळबाग लागवड केलेल्या अनिल जानतिने यांच्या प्रक्षेत्राची पाहणी करण्यात आली. प्रभाकर धोंडीबा गणूचे यांच्या शेडनेट ची पाहणी करून मागेल त्याला शेततळे योजनेअंतर्गत शेततळे खोदकाम व शेततळे अस्तरीकरणाची पाहणी केली. घोणसी येथील प्रगतिशील शेतकरी संदीप मालुसरे यांच्या एमआयडीएच अंतर्गत ड्रॅगन फ्फ्रुट या पिकाची पाहणी करून मार्गदर्शन करण्यात आले. तसेच घोणसी येथील प्रगतिशील शेतकरी कालिदास रमेश, डावळे यांच्या प्रक्षेत्रावरील भाऊसाहेब फ्फुंडकर फ्फळबाग लागवड योजनेअंतर्गत फ्फळबाग लागवड, वनशेती, बायोगॅस युनिटची पाहणी करून डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत घरच्या घरी प्रक्षेत्रावर जैविक कीड व रोग प्रतिबंधासाठी केलेल्या औषध निमिर्ती व्यवस्थेची पाहणी करून कौतुक करण्यात आले. यावेळी तालुका कृषी अधिकारी आकाश पवार, कृषी पर्यवेक्षक नानासाहेब धुप्पे, कृषी सहाय्यक आनंद सोनकांबळे यांच्यासह गावातील शेतकरी उपस्थित होते.

# उपमुख्यमंत्री -नारीशक्ती सन्मान २०२४ ने नीता मोरे सन्मानित



**उदगीर (प्रतिनिधी)** सन्मान कर्तुत्वाचा सन्मान नारीशक्तीचा या अंतर्गत महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त शैक्षणिक क्षेत्रातील पुरस्कार प्रदान करण्यात आला.

महाराष्ट्रराज्याचे क्रीडा युवक व बंदरे, कॅबिनेट मंत्री मा.संजयभाऊ बनसोडे साहेब यांच्या शुभहस्ते हा उपमुख्यमंत्री -नारीशक्ती सन्मान २०२४ प्रदान करण्यात आला. याप्रसंगी अफसरबाबा शेख, अभिजीत औटे, ॲड. दिपाली औटे, मधुमती कनशेट्टे हे उपस्थित होते. त्यांच्या या यशाबद्दल लाल बहादुर शास्त्री माध्यमिक स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष मधुकरराव वट्टमवार, केंद्रीय समितीचे सदस्य तथा स्थानिक समन्वय समितीचे कार्यवाह शंकरराव लासुणे, माध्यमिक शालेय समितीचे कार्यवाह सतनप्पा हुरदळे, माध्यमिकचे मुख्याध्यापक अनंतराम कोपले, प्राथमिकचे मुख्याध्यापक अंकुश मिरगुडे, उपमुख्याध्यापक अरुण पत्की, पर्यवेक्षक माधव मठवाले यांनी अभिनंदन केले.

***तापमान***

*दि.२७/०७/२०२४

कमाल तापमान-२७.५ से.

किमान तापमान२३.५.से

*आर्द्रता - ८०%*

पर्जन्य - १ मीमी

*शरिर क्रिया विभाग पशुवैद्दकिय उदगीर

**DECLARATION IN CHANGE NAME AND ADDRESS**

I, HAVE CHANGE MY NAME FROM **SHEIKH AFJAL SHEIKH CHAND** TO **SHAIKH AFJAL CHANDSAB** HENCE FROTHER DECLERATION WILL BE KNOWN BY THIS NAME I WILL USE **SHAIKH AFJAL CHANDSAB** IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY CHILDREN AND FAMILY.

I HAVE MY OLD NAME: **SHEIKH AFJAL SHEIKH CHAND**

MY NEW NAME: **SHAIKH AFJAL CHANDSAB**

MY OLD ADDRESS: **AJANSONDA BK, MUSALMAN GALLI CHAKUR, LATUR**

MY NEW ADDRESS: **MUSLAMAN GALLI, MU AJANSONDA BK TQ CHAKUR LATUR, MAHARASHTRA**


**बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.**

**शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७**

| कालावधी | व्याजदर | जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर |
|---|---|---|
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ६.००% | ६.५०% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ७.००% | ७.५०% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.००% | ८.५०% |
| १ वर्ष १ महिना ते २ वर्ष | ९.००% | ९.५०% |
| २ वर्ष १ महिना ते ३ वर्ष | ९.२५% | ९.७५% |
| ३ वर्षापुढील मुदतीकरीता | १०.००% | १०.५०% |

मासिक प्राप्ती योजना :- आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८०६/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३० महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (९.७५%)

दाम दुप्पट योजना :- रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)

**उपलब्ध सुविधा**


वेअरहाउस लोन, गोल्ड लोन, कर्ज प्रक्रिया, जलद सेवा, एसएमस बँकींग, मोबाईल बँकींग



# वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा



अमोल हळीघोंगडे यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !



: शुभेच्छुक :

योगेश बेलुरे